## पुस्तके मिळण्याची ठिकाणे

**पुणे** : मॅजेस्टिक,२४४५९८१५ / रसिक,२४४५११२९ / राका,२४४५८११७/ विद्या ,२४३३५४४८/ वर्मा २४४५६५२५ / उत्कर्ष,२५५३२४७९ डायमंड,२४४८०६७७/ रविंदु /उज्वल २४४५६९०८ / परेश, २४४५९१९० अनमोल ,२४४५७०६६ पाटील,२४४८७६२९ / बुकलॅण्ड, २४२२१०४३ / साधना,२४४५९६३५ / समर्थ , २४४८३९१६ महाजन ब्रदर्स, २४४८९९६६ / पाथफाईंडर, २४३३०७०१ **मुंबई** : आयडियल, २४३०४२५४ / मॅजेस्टिक दादर, २४३०५९१४ / हळबे, गिरगाव २३८८४९६४/ जवाहर पार्ले, २६१४८७३५/ मॅजेस्टिक, विलेपार्ले ३०९१३२३४ / शब्द,बोरिवली २८३३२६४० **वाशी (नवी मुंबई)** : वर्षा वितरण २७८२५४६ **ठाणे** : मॅजेस्टिक, २५३७६८६५ / **डोंबिवली** - ज्ञानदा, ८६२५८९ / मॅजेस्टिक, ८०११०१/दिपाली ४३७६७१/ **कल्याण**- सरस्वती २०४७८१ / **विरार**- मुद्रा २५११०९१ **बदलापूर** - ग्रंथसखा २६७३०७१ **बेळगाव :** नवसाहित्य २४२१०७८ **नाशिक** : ज्योती २३०६७० / चौधरी, २५७४४८१ / दीप ,२५९४४९८/करण २३१४२४५ **नागपूर** : साहित्य प्रसार, २५२३७०२ / नागपूर पॉप्युलर, २५२४२७८ **नांदेड** : अभय , २४०२६५ **लातूर** : भारतीय पुस्तकालय, २४८३८४ **औरंगाबाद** : विद्या बुक्स, २३३७३७१ / श्री बालाजी, २६५३८५४ / अमॅझॉन २३३५२२० **वडवळ नागनाथ** : गजानन बुक स्टॉल,५५८७१ **कराड** : दिलखुष,२२२८३३ **सातारा** : लोकमान्य ग्रंथ भांडार, २३७४३६**अकोला** : मिहीर उद्योग केंद्र, २४४२१३८ **सांगली :** स्टुडंटस्, २३७४२५० / ताम्हनकर, २३७३६०५ / **मिरज** रत्नाकर, २२२२५६४ **खामगांव** : गोर्ले बुक स्टॉल, २५५२६४ **वर्धा** : केळकर ब्रदर्स, २४३६५८ **सोलापूर** : सरस्वती बुक डेपो, २६२६६३०/ कुंदूर बंधू पुस्तक भांडार, २६२६१५६/ नंदादीप बुक सर्व्हिसेस, २६२८३३२ **अमरावती** : पॉप्युलर बुक सेंटर, २५७३०८१ **भंडारा** : अनामिका बुक एजन्सीज **रत्नागिरी** : ग्रंथस्नेह ग्रंथ वितरण, २२४८६८ **जळगाव** : प्रशांत , २२२७२३१ / शारदा प्रकाशन व बुक डेपो, २२२३७६५ **धुळे** : मनोज पुस्तकालय, २३४३९२ **गोवा** : वर्षा २४२५८३२ **अहमदनगर** : बापट २३४४५४२/ उदय २३४७३०७ / ललित २२२३०३१

**प्रतिमा प्रकाशन-** १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णू मंदीर चौक, पुणे, फोनः २४४७८९०८

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे, फोनः २४४७६९२४



◆ फेब्रुवारी २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक दुसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुस्तक परिचय** | |
| **वसुंधरा** : निरंजन घाटे | २५ |
| **नवे शतक** : निरंजन घाटे | २९ |
| **ऑन द विंग्ज** | |
| **ऑफ इगल्स :** अनु.ज्योत्स्ना लेले | ३३ |
| **इंदिरा :** अनु. लीना सोहोनी | ३७ |
| **पुरस्कार** | ४५ |
| **श्रद्धांजली** | ४९ |
| **ग्रंथालयांना आवाहन** | ५० |

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### इंटरनॅशनल दीक्षित

पुण्यातील इंटरनॅशनल बुक सर्व्हिस या ग्रंथदालनाने १ जानेवारीला आपली अमृत महोत्सवी वाटचाल पूर्ण केली; आपल्या नावाला जागून पुणेकरांनाच नव्हे तर देशपरदेशाच्या ग्रंथप्रेमींना जगभरातील पुस्तके उपलब्ध करून देण्याचे व्रत आरंभापासूनच स्वीकारून, ते गेली पंचाहत्तर वर्षे अविरतपणे चालू ठेवले आहे याबद्दल द्यावेत तेवढे धन्यवाद कमीच ठरतील. पुण्यातील वाचक-अभ्यासक तसे चोखंदळ आणि चिकित्सक. तशात पुणे हे विद्येचे माहेरघर, फर्ग्युसन कॉलेज, एस. पी. कॉलेज, डेक्कन कॉलेज अशा मातबर संस्थांचा सर्वदूर दबदबा, त्याचबरोबर पेशवाईतले व नंतरच्या इंग्रज अमदानीत मराठी व इंग्रजी भाषेतील विद्येचे पुणे हे प्रमुख ज्ञानकेंद्र. पुण्याच्या विद्वत्तेची परंपरा भारतभर महशूर. भारतव्यापी आंदोलनांचे मुख्य केंद्र म्हणूनही पुण्याची महती देशभर सर्वांच्या आदराला पात्र ठरलेली. जागृत, बौद्धिक, पारंपरिक आणि नवविद्येचे केंद्र म्हणून पुण्याचा दरारा मोठा...पुण्याच्या या देशपर देशातल्या प्रतिमेला दृढ करण्यात निबंधमाला, केसरी, काळ, ज्ञानप्रकाश, वगैरे पत्रांचा मोठा सहभाग...त्यातच ग्रंथव्यवसायाचेही पुणे हे प्रमुख केंद्र...

'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'ने १९३० मध्ये आपला शुभारंभ करून विद्याप्रेमी जागरुक पुणेकरांना इंग्लंड-अमेरिकेतील उत्तमोत्तम ग्रंथ पुरवण्याचा विडा उचलला; आणि पुण्याच्या विद्वत्ता-व्यासंगाला विशाल, जागतिक परिप्रेक्ष्य सहजपणे प्राप्त व्हावे अशी जणू व्यवस्था करून दिली. विठ्ठलराव दीक्षित यांनी १९३० मध्ये या ग्रंथदालनाचा आरंभ करताना आपल्यासमोर आंतरराष्ट्रीय विचार-विनिमयाचेच स्पष्ट उद्दिष्ट ठेवून, आपल्या नावानच 'इंटरनॅशनल' या विशेषणाला स्थान दिले; आणि ते सार्थही ठरवले. त्यामुळे अल्पावधीतच पुण्यातील जागरूक वाचक-ग्राहकांची पावले डेक्कन कॉर्नरवरच्या या ग्रंथदालनाकडे वळू लागली आणि इंग्लंड-अमेरिकेतील अद्ययावत, ताज्या ग्रंथांचे तेथील वैभवशाली भांडार बघून त्यांचे डोळे दिपू लागले.

ग्रंथप्रेमींनी हवा तेवढा वेळ बसावे, हवे ते पुस्तक चाळावे, वाचावे आणि जमेल तेव्हा विकत घेऊन जावे असे त्यांचे उदार धोरण होते. दुकानात येणाऱ्याने काहीतरी खरेदी करून जावेच असा त्यांचा आग्रह नव्हता; आपल्या ग्रंथदालनात येणाऱ्यांनी मनसोक्त पुस्तके चाळावीत; त्याबद्दल आपल्याशी बोलावे, इतर समानधर्मीय



वाचकांशी बोलावे अशी त्यांची इच्छा असे आणि नित्य येणाऱ्या अशा जिज्ञासूंना चहाकॉफीचा आग्रहही ते करीत. काव्यशास्त्रविनोदाची मैफल तेथे जमत राहावी असा त्यांचा प्रयत्न असे. मात्र तो रिकामटेकड्यांचा गप्पांचा अड्डा बनू नये याचीही दक्षता ते घेत. खऱ्याखुऱ्या अभ्यासकांना ते जरूर ते संदर्भ साहित्य उपलब्ध करून देत. त्यांनी सर्वच पुस्तके विकत घ्यायलाच हवीत असा त्यांचा कधीच दृष्टिकोन नसे. ज्याला पुस्तक हवे असते तो ते आपापल्या आर्थिक कुवतीनुसार घेतोच; हे त्यांना ठाऊक होते. ग्रंथदालनात हजारो पुस्तके असतात. ती सर्वच्या सर्व कोणी एकरकमी घेऊ शकणार नाही; हेही त्यांना ठाऊक होते. वैयक्तिक ग्राहक आणि संस्थात्मक खरेदी यातील सीमारेषाही त्यांना ठाऊक होत्या. त्यामुळे 'इंटरनॅशनल'मध्ये तासनतास बसणाऱ्यांनाही कधी संकोच वाटत नसे किंवा कोणी सेल्समन त्याकडे भ्रुकुटी ताणून बघत नसे. इंटरनॅशनलमधला ताज्या ताज्या ग्रंथांचा खजिना पहाणाऱ्या ग्रंथप्रेमींच्या डोळ्यातला अधाशीपणा आणि आनंद बघूनच त्यांचे पोट जणू भरत असे...'ज्याला जे हवं त्याला ते मिळावं' असा त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे स्टॉक भरपूर असे. त्याचमुळे पंडित जवाहरलाल नेहरू पुण्याला कधी आले तर इंटरनॅशनलला भेट देण्यासाठी थोडा तरी वेळ राखून ठेवत. डॉ. राधाकृष्णनही पुण्यात आले की भेट देत. भारतातले अनेक नामवंत अभ्यासक, संशोधक, ग्रंथप्रेमी आवर्जून इंटरनॅशनलला भेट देत. डॉ. दामोदर धर्मानंद कोसंबी, रा. ना, दांडेकर, डॉ. वाडेकर, श्री. के. क्षीरसागर, अहिताग्नी राजवाडे यासारखे अभ्यासक आपली नवनव्या ग्रंथांची हौस इंटरनॅशनलच्या माध्यमातून भागवत असत. आचार्य अत्रे, केशवराव भोळे, पु. ल. देशपांडे, डॉ. रा. चिं. ढेरे... इंटरनॅशनलमध्ये तासन् तास कसे जात हेच कळत नसे. इंडॉलॉजीच्या अभ्यासकांनाही इंटरनॅशनलचा मोठा आधार वाटे. डॉ. सोन्थायमर, इरिना ग्लुश्कोवा, अॅन फेल्डहाऊस, फ्रँक कॉनलॉन, मॉरिन पॅटरसन, रेव्ह. मॅथ्यू लेदरले...अशांना इंटरनॅशनल म्हणजे आपले संदर्भ ग्रंथालयच वाटे. आपल्या अभ्यासविषयाला उपयुक्त असे सगळे साहित्य, सगळे ग्रंथ इंटरनॅशनलचे दीक्षित मिळवून देतील असा भरवसा वाटे. अनेक दुर्मिळ पुस्तके तेथे मिळत, तसेच नवीन अद्ययावत पुस्तकेही तेथे सहज उपलब्ध असत. त्यामुळे कोणीही देशातला-परदेशातला अभ्यासक पुण्यात आला तर आपल्या संदर्भग्रंथासाठी इंटरनॅशनलला प्रथम भेट देतो आणि मग विद्यापीठाच्या ग्रंथालयाकडे वळतो. जागतिक ग्रंथभांडाराचे खजिने पुणेकरांना खुले करून देण्यात इंटरनॅशनलचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. त्यामुळे नोबेल पुरस्कार विजेते विल्यम गोल्डिंग, बुकर पुरस्काराची मानकरी अरुंधती रॉय यांच्यासारख्यांनाही इंटरनॅशनलला भेट देण्यात धन्यता वाटते. इंटरनॅशनल बुक सर्व्हिसला भेट दिल्याशिवाय पुण्याचा दौरा पूर्ण झाला असे वाटतच नाही, नुकतेच नॅशनल ड्रामा स्कूलचे इब्राहिम अल्काझी पुण्यात आले होते. ते मूळचे

पुणेकर. इंटरनॅशनलचे जुने ग्राहक. त्यांनाही इंटरनॅशनलला भेट देऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला.

विठ्ठलराव दीक्षित यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव उपेन्द्र दीक्षित यांनी इंटरनॅशनलची धुरा तितक्याच समर्थपणे पुढे चालवली आहे. इंटरनॅशनलने गेली ७५ वर्षे जो वाचकांचा लोभ संपादन केला आहे त्याला तोड नाही. ताजी देशी-परदेशी पुस्तके इंटरनॅशनलमध्ये सतत उपलब्ध असतात; आणि अनेक दुर्मिळ पुस्तकेही तेथे विनासायास मिळतात. पुणेकरांच्या जागतिक परिप्रेक्ष्याला इंटरनॅशनलने विशाल व्यापक अवकाश उपलब्ध करून दिला आहे. पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाचे व ग्रंथसंस्कृतीचे इंटरनॅशनल हे एक अभिमानास्पद प्रतीक आहे.

इंटरनॅशनलचा ग्रंथसंस्कृतीच्या प्रसाराचा वसा असाच अखंड चालू राहो ही प्रार्थना.

**-संपादक**


**७८वे**

**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन**

**२८, २९, ३० जानेवारी २००५**

**स्थळ**

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज प्रांगण.
शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक.

कथा, कादंबऱ्या, मार्गदर्शन, आरोग्य
व्यक्तिमत्वविकसन,ललितगद्य,पाकशास्त्र,अनुवादित,
चरित्रे- आत्मचरित्रे,याप्रमाणेच विविध प्रकारच्या दर्जेदार
पुस्तकांसाठी...अग्रगण्य नाव

**मेहता पब्लिशिंग हाऊस**




## साहित्यवार्ता

*** आनंद यादव यांच्या लेखणीतून साकारतोय 'लोकसखा ज्ञानेश्वर'**

पुणे : सर्वसामान्यांसाठी 'ज्ञानेश्वरी' लिहिणारे मराठीतील आद्यकवी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीला ७०० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. पण ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी हा अत्यंत प्रतिभाशाली तत्त्वज्ञ आणि शब्दप्रभू असणारा संवेदनशील तरुण तेव्हा अनेक प्रतिकूल परिस्थितींना तोंड देऊनही कसा घडला? संजीवन म्हणजे प्रत्यक्ष जीवंत समाधी घेताना त्याची मनस्थिती कशी होती? तसेच आजच्या आधुनिक काळात त्यांचे महत्त्व कोणते आहे? अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी ज्ञानेश्वरांवरील 'लोकसखा ज्ञानेश्वर' ही पहिली वास्तववादी कादंबरी लिहून पूर्ण करत आणली आहे.

अमेरिकेतील अनंत लता लाभसेटवार आणि नागपुरातील लाभसेटवार प्रन्यास यांच्यातर्फे डॉ. यादव यांना नुकताच त्यांच्या वाङ्मयीन कार्याबद्दल जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला. एक लाख रुपयांच्या या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्काराचे ते पाचवे मानकरी असून ८ जानेवारी रोजी मुंबईत दिनानाथ मंगेशकर नाट्यगृहात शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते डॉ. यादव यांना हा पुरस्कार देण्यात आला.

ज्ञानेश्वरांवर भक्तीरसात आणि केवळ संतत्त्व आणि चमत्कारांनी भरलेले काव्य आणि कादंबऱ्या यापूर्वीही लिहिल्या गेल्या आहेत, असे डॉ. यादव यांनी सांगितले. 'महाराष्ट्र टाईम्स'शी बोलताना ते म्हणाले की, पण त्यातून ज्ञानेश्वरांचे अतिशययोक्तीपूर्ण आणि चमत्कारांनी भरलेली वर्णनेच आढळतात.

डॉ. यादव म्हणाले की, जीवनातील वास्तव आनंदाने मनाच्या उन्मनीय अवस्थेत स्वीकारून ज्ञानेश्वरांनी वयाच्या २३ व्या वर्षी संजीवन समाधी घेऊन 'स्वत:ला जाणीवपूर्वक संपवले'. पण मराठीत हे आजवर कुणी नीटपणे मांडले नाही.

आजच्या भाषेत विशेष कौशल्य असणारा ज्ञानेश्वर हा 'गिफ्टेड' मुलगा. या वयातील त्यांची वैचारिक पक्वता, तात्त्विक पातळीवरची उंची आणि विश्वात्मकदेव म्हणून सर्वधर्मजातीपलिकडे गेलेले त्यांचे विचार हे सर्वच स्तिमित करणारे वाटतात. त्यावेळच्या धर्मसत्ता, विद्वता याची मक्तेदारी असणाऱ्या सवर्ण वर्गापुढे

ज्ञानेश्वर उभे राहिले. त्यांचा मुळापासून शोध घेण्याच्या ध्यासातूनच तत्त्वज्ञ-संत-वागेश्वर 'लोकसखा ज्ञानेश्वर' कादंबरीरूपात साकार होत आहे, असे डॉ. यादव यांनी सांगितले.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध होण्याऱ्या या कादंबरीसाठी गेले दोन वर्ष त्यांनी संशोधन करून त्यांनी चारशे पाने लिहून पूर्ण केली आहेत. ते म्हणाले की, ज्ञानेश्वरांच्या मनातील एक संवेदनशील माणूस म्हणून असणारी स्पंदने आणि त्यांच्यावर वडिलांचे झालेले संस्कार यातून मी हा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

'अनुभवामृता'मध्ये ज्ञानेश्वरांची संजीवन समाधी घेण्यामागची मानसिक अवस्था त्यामधील आठव्या आणि नवव्या अध्यायात मांडली आहे तसेच संत नामदेवांनीही ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले. त्याचा आधार ही कादंबरी लिहिण्यासाठी घेतला आहे. डॉ. यादव म्हणाले की, ज्ञानेश्वरकालीन मध्ययुगीन विघटित समाज आणि आजचा आधुनिक पण अजूनही अराजकतेत अडकलेला मराठी समाज या दोन्हींसाठी त्यांचा विश्वात्मकतेचा संदेश संजीवनी देणारा आहे. (विवेक सबनीस- (महाराष्ट्र टाईम्स) यांच्या सौजन्याने)

### * पुस्तके ऐकण्याची सवय लावा!

पुस्तक वाचायचंय, पण दिवसभर कॉम्प्युटरसमोर बसल्यामुळे डोळ्यांची अवस्था वाचण्यापलीकडे गेलीय... पण आता यावरही उपाय आहे. डोळ्यांना विश्रांती देऊन तुम्ही आता पुस्तक 'ऐकू' शकता. हल्ली अनेक महत्त्वाची आणि नावाजलेली पुस्तके कॅसेट आणि सीडीच्या स्वरूपात उपलब्ध होत असतात.

गिरीश कर्नाड यांच्या आवाजातल्या अब्दुल कलाम यांच्या प्रसिद्ध 'विंग्ज ऑफ फायर' पासून ताणतणाव, मार्केटिंग, मॅनेजमेंट, सेल्स सारख्या विषयावरील 'राम सेव्ज द सेजेस', 'क्रिश्ना अॅन्ड कालिया', 'हनुमान्स टेल ऑफ फायर', 'भीम अॅन्ड बकासुरा' इ. पुराणातील अनेक रोमहर्षक कथाही श्रवणभक्तीसाठी उपलब्ध आहेत. पाश्चिमात्य देशात या 'सीडी पुस्तकां'चा 'ट्रेण्ड' यापूर्वीच लोकप्रिय झाला. पण आपल्याकडे आधी इंग्रजीत आणि हळूहळू मराठीतही सीडीचा हा प्रवाह रुळायला सुरुवात झाली आहे.

रिझर्व बँकेचे ज्येष्ठ सल्लागार डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'मी अन् माझा बाप' हे पुस्तक सीडीच्या रूपात प्रकाशित झाले. सीडीवर पूर्ण पुस्तक नसले तरी बराचसा भाग असून तो जाधवांच्याच आवाजात ऐकता येईल. सीडीमुळे पुस्तकाचा होणारा कायमस्वरूपी संग्रह, श्रवणप्रक्रियेत गोष्टीचा सापडत जाणारा बाज...यामुळे ही कल्पना बऱ्याचशा पुस्तकप्रेमींना पसंत पडली आहे.

'मी अन् माझा बाप'मध्ये जे संवाद नाशिकच्या गावरान भाषेत आहेत ते लेखणीमधून तितकेसे साधता येणे शक्य नव्हते; पण या माध्यमामुळे तो बाज



मला हवा तसा उतरला आहे; असे डॉ. नरेंद्र जाधव यांना जाणवले.

'बटाट्याची चाळ', 'निवडक पुलं' आदि पु.ल. देशपांडे यांचे साहित्य कॅसेट आणि सीडीच्या माध्यमातून उपलब्ध आहेच.

### * 'गॅट्स'नुसार उच्चशिक्षण खुले करावे - डॉ. कोळस्कर

जागतिक बदलांशी सुसंगत वेग ठेवण्यासाठी 'गॅट्स' करारानुसार भारतीय उच्चशिक्षण खुले करायलाच हवे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अशोक कोळस्कर यांनी व्यक्त केले. पुणे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री सुरेश जैन यांच्या हस्ते करण्यात आले.

उच्चशिक्षणाचा 'गॅट्स' करारांतर्गत सेवाक्षेत्रात समावेश करण्याची गरज आहे, असे सांगून डॉ. कोळस्कर म्हणाले की, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोरावर जग पुढे गेले आहे. परंतु, उच्चशिक्षण, अभियांत्रिकी शिक्षणामध्ये अपेक्षित बदल झालेला नाही. विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यासारख्या संस्था (एआयसीटीई) दिल्लीत बसून निर्णय घेतात. स्थानिक स्तरावरील वस्तुस्थिती त्यामध्ये विचारात घेतली जात नाही. स्वायत्ततेअभावी विद्यापीठे ही जखडली गेली आहेत. म्हणूनच उद्योगविश्वाला अभिप्रेत असलेले शिक्षण देणे शक्य होत नाही. विद्यापीठांमध्ये निर्णय अभावानेच घेतले जातात, घेतलेच तर अंमलबजावणीसाठी यंत्रणा नाही. अशा परिस्थितीत गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी बाहेरील संस्थांची मदत घेण्यास (आऊटसोर्सिंग) काहीच हरकत नाही, असे ते म्हणाले.

उच्चशिक्षणासाठी निधीचा तुटवडा आहे. त्यामुळेच खासगी स्रोतांद्वारे निधीची उभारणी करण्यची गरज आहे, असे जैन यांनी स्पष्ट केले.

### * पुस्तकांवर कोणताही कर लावणार नाही : देशमुख

पाठ्यपुस्तक असो वा वाचनीय पुस्तक असो, पुस्तकांच्या विक्रीवर नगरपालिकेने आणि महानगरपालिकेने कुठलाही कर लावू नये असे आदेश राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर देण्यात येतील असे आश्वासन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी नागपूरच्या राजाराम वाचनालयात दिले.

देशमुख पुढे म्हणाले, १०० वर्षांहून अधिक काळ झालेला आहे अशी वाचनालये हीच खरी संदर्भ ग्रंथालये समजून त्यांना पुरविण्यात येणाऱ्या विजेवर व्यापारी पद्धतीची आकारणी न करता घरगुती आकार लावण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

मुख्यमंत्र्यांनी राजाराम वाचनालयातील ग्रंथसंपदा पाहून या अमोल ठेव्याचे चांगले जतन झाले पाहिजे असे मत व्यक्त केले.

## * भेदिक शाहिरांचा मेळावा

भेदिक शाहिरीचे जनक कविराज हैबती महाराज यांचे विचार तळागाळात पोहचवण्यासाठी तरुणांनी भेदिक शाहिरीकडे वळावे, असे प्रतिपादन शाहीर गजानन गुरव यांनी केले.

पुसेसावळी येथे कविराज हैबती महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील भेदिक शाहिरांचा मेळावा झाला. अध्यक्षस्थानी मिरज येथील शाहीर रामचंद्र जाधव होते. कविराज हैबती महाराजांच्या प्रतिमेची सवाद्य दिंडी मिरवणूक काढण्यात आली. शाहिरांच्या भेदिक गायनाचा कार्यक्रम झाला.

गुरव म्हणाले, भेदिक शाहिरांना शासनाने स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणे पेन्शन योजना सुरू करावी. कला जिवंत ठेवण्यासाठी आयुष्य वेचलेल्या शाहिरांची अवस्था उतारवयात बिकट होते. शाहिरांच्या कार्याची दखल घेऊन शासनाने मानधन सुरू करावे.

राशीवडे ब्रुद्रुक (कोल्हापूर) चे शाहीर विठ्ठल टिपूगडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पुसेसावळी येथील भेदिक मंडळाने भेदिक गायन सादर केले. या कार्यक्रमास अनेक ठिकाणचे शाहीर उपस्थित होते.

## * पन्नास वर्षांनंतर पुन्हा एकदा 'श्यामची आई'

'श्यामची आई' चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीत इतिहास रचला. ५० वर्षांनंतर 'श्री क्रिएशन्स'च्या सगुण सावंत, विनय सामंत, आशीष पेडणेकर साने गुरुजींवर चित्रपट काढणार आहेत.

'श्वास'मध्ये परश्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरची भूमिका केलेल्या संदीप कुळकर्णी यांची निवड 'साने गुरुजीं'च्या मध्यवर्ती भूमिकेसाठी करण्यात आली आहे. त्यांच्या बरोबरच ख्यातनाम अभिनेते डॉ. श्रीराम लागू, सदाशिव अमरापूरकर, विक्रम गोखले, निळू फुले यांच्यासह राजीव, मनोज कोल्हटकर, विघ्नेश जोशी, अतुल साटम हे कलाकारही 'साने गुरुजी' चित्रपटात काम करणार आहेत.

या चित्रपटाचे दिग्दर्शन संदीप कश्यप करणार आहेत. चित्रपटाच्या निर्मितीसाठी १ कोटी खर्च अपेक्षित असून महाराष्ट्र शासनाने १० लाखांचे अर्थसहाय्य केले आहे. उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अरुण गुजराथी यांनीही सहाय्य करण्याचे आश्वासन दिले आहे. 'साने गुरुजी' चित्रपटासाठीच्या आठ गाण्यांचे रेकॉर्डिंग नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे.

## * 'मातीतील अनुभवां'मुळे मराठी कथा प्रगल्भ

''मराठी कथा परकीय प्रभावापासून मुक्त झाली आहे. आता या मातीतले अनुभव अशा कथांमध्ये येऊ लागल्याने मराठी कथा अधिक प्रगल्भ बनू लागली



आहे,'' असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी केले. समीक्षकांनी उचलून धरल्यानेच मराठी कथा लोकप्रिय झाल्याचेही ते म्हणाले.

'आशय सांस्कृतिक'तर्फे आयोजित 'कथा १५०' या परिसंवादाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. मराठी कथाप्रकाराला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादात राजन गवस, मेघना पेठे, सुबोध जावडेकर व सानिया यांनी भाग घेतला.

प्रा. जाधव म्हणाले, ''जन्म आणि मृत्यूच्या सीमेवर लेखकाचा जन्म होतो. म्हणूनच जीवनाचे प्रथम आणि अंतिम आकलन कथात्मक असते. मराठी कथांच्या विकासात नियतकालिकांचा महत्त्वाचा वाटा आहे. नियतकालिके कमी होत असल्याने साहजिकच वाचकही कमी होत आहेत. मराठी समाज बहुजिनसी व विस्तारलेला असल्याने समग्र मराठी समाजाला स्पर्श करू शकेल, अशी मराठी कादंबरी लिहिणे शक्य नाही. २१ वे शतक विज्ञानकथांचे युग असेल. परंतु; त्यात असलेली 'फँटसी' गेली, तर अशा कथांमधील गंमत निघून जाईल,''

श्री. गवस म्हणाले, ''स्वत:ला तपासून पाहण्यासाठीही कथा या प्रकाराचा उपयोग होतो. कथा लिहिताना पूर्वपरंपरेतील शक्तिस्थळे वापरण्याचा माझा प्रयत्न असतो. लेखनाच्या सुरवातीच्या काळात जी. ए. कुलकर्णींच्या कथांचाही माझ्यावर प्रभाव होता.''

श्री. सुबोध जावडेकर म्हणाले, ''विज्ञानकथा वास्तवाच्या जवळ जाऊन भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे भविष्यातील कथा म्हणजेच विज्ञानकथा असे समीकरण मांडता येईल. या कथा वाचकाला इतरांपेक्षा एक पाऊल पुढे नेतात व वेगळ्या दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहायला शिकवतात. ही कथांची बलस्थाने आहेत.''

## * इंग्रजी पुस्तकांसाठी हच-क्रॉसवर्डचे दोन पुरस्कार

भारतातील साहित्यिक गुणवत्तेचा गौरव करण्याच्या उद्देशाने 'हच क्रॉसवर्ड बुक ॲवॉर्डस २००४' देण्यात येणार असल्याची घोषणा क्रॉसवर्ड बुकस्टोअरचे व्यवस्थापकीय संचालक आर. श्रीराम आणि हचिसन एस्सारचे व्यवस्थापकीय उप-संचालक संदीप दास यांनी केली.

भारतीय प्रकाशकांकडून त्यासाठी प्रवेशिका मागवण्यात येणार असून मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि तीन लाख रुपये रोख असे पारितोषिकाचे स्वरूप आहे.

हच क्रॉसवर्ड बुक ॲवॉर्ड दोन विभागात देण्यात येणार आहे. पहिल्या विभागात भारतीय लेखकाने इंग्रजी भाषेत केलेल्या लेखनासाठी आणि दुसऱ्या विभागात भारतीय भाषेतील लेखनाच्या इंग्रजी भाषांतरासाठी हे पुरस्कार देण्यात येतील. या प्रत्येक विभागातून निवडलेल्या प्रत्येकी पाच पुस्तकांची यादी जाहीर

करण्यात आली आहे. भाषांतर विभागासाठी मूळ लेखक आणि भाषांतरकार या दोघांनाही गौरवण्यात येणार आहे.

### * ग्रंथालयांचे अनुदान दुप्पट

ग्रंथ व नियतकालिकांच्या किंमतीत तसेच इतर खर्चात सातत्याने होणारी वाढ लक्षात घेऊन सरकारमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिली.

या आधी मे २००४ मध्ये या ग्रंथालयाच्या अनुदानात सरासरी ४० टक्के वाढ करण्याच्या निर्णय घेण्यात आला होता. त्याचा लाभ 'ड' वर्ग ग्रंथालयांना होऊन त्यांच्या अनुदानात दुप्पट वाढ झाली होती. मात्र ताज्या निर्णयामुळे सर्व वर्गवारीच्या ग्रंथालयांचे अनुदान दुप्पट होणार आहे. ग्रंथालय सेवकांच्या वेतनात वाढ होऊन,नवी पुस्तके घेण्यासाठी निधी उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. राज्यात सध्या पाच हजार ५१७ सरकारी ग्रंथालये असून त्यातील सुमारे चार हजार ग्रंथालये ग्रामीण भागांत आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे १४ हजार ते एक लाख ८० हजार रुपयांची अनुदान वाढ अपेक्षित आहे.

### * ग्रंथ निर्मिती मंडळ बंद

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या योजनेनुसार नागपुरात चालू असलेले 'महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ' कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय कॅबिनेट बैठकीत घेण्यात आला. प्रादेशिक भाषेतून विद्यापीठाचे अभ्यासक्रम या धोरणाच्या अंमलबजावणीनुसार १९६९ साली या मंडळाची स्थापना झाली होती. सुरुवातीला केंद्र सरकारचे १०० टक्के अनुदान या संस्थेला मिळत असे. १९७७-७८ पासून ते बंद करण्यात आल्याने राज्य सरकारने ५० हजार रुपयांचे अनुदान सुरू केले होते. या काळात मंडळाकडून पुस्तकांची अपेक्षित विक्री न झाल्याने ते तोट्यात आले. त्यामुळे सरकारला दरमहा ७५ हजार रुपये खर्च विनाकारण करावा लागत असे. मंडळ बंद करण्यात आल्यानंतर संस्थेची चल-अचल संपत्ती नागपूर विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात येणार असून तेथील पुस्तके विद्यापीठांना आवश्यकतेनुसार वितरित करण्यात येतील, असे मुख्यमंत्री देशमुख यांनी सांगितले.

### * तीन लेखिका

मराठी साहित्यात आपल्या लेखनशैली व सादरीकरणाने वेगळा ठसा उमटविलेल्या ज्योत्स्ना देवधर, डॉ. अरुणा ढेरे व मंगला गोडबोले या तीन लेखिकांचा 'असे घडलो आम्ही' हा अनुभवकथनाचा कार्यक्रम 'मृत्युंजय प्रतिष्ठान'तर्फे आयोजिण्यात आला होता.

डॉ. ढेरे म्हणाल्या ''पुस्तकांच्या भिंती असलेल्या घरात जन्म झाल्याने



पुस्तकांची सोबत लहानपणापासून मिळाली. वडिलांचे माझ्यापेक्षा पुस्तकावर जास्त प्रेम होते. एकत्र सहजीवनाचा अनुभव लहानपणी वाड्यात उपभोगायला मिळाला, तेथेच वेगवेगळ्या पेशाची माणसे व भलेबुरे प्रसंग अनुभवायला मिळाले. माणसावर व भोवतालच्या निसर्गावर प्रेम करून ते संवेदनशीलतेने वाचायला वडिलांनी शिकविले. पुराणकीर्तनाचे जग, स्त्रियांच्या व्यथा व लहानपणापासून मिळालेल्या या सर्व अनुभवांतून लिखाण करायला लागले.''

सौ. गोडबोले म्हणाल्या, ''वाङ्मयाचा सहवास घडेल असे काही लहानपणी घडले नाही; परंतु घरातील प्रत्येकाला कलेची उपजतच आवड होती. मला वाचनाचे वेड होते, समोर येईल ते वाचत गेले. वाचनाचा आनंद व वाचलेले सर्वांना सांगायचे हा छंद त्यामुळे बनत गेला.''

श्रीमती देवधर म्हणाल्या, ''मी घडले नाही तर, लोकांनी मला घडवले. बाबासाहेब पुरंदरे यांनी इतिहासाचे धडे दिले. गो. नी. दांडेकर यांनी रामायण-महाभारताचे ज्ञान दिले. भालबा केळकर, पुरुषोत्तम जोशी, भोपटकर सर या सर्वांच्या परिश्रमाने मला मराठीवर प्रभुत्व मिळू शकले.''

### * विज्ञान तंत्रज्ञानात भारताला मोठ्या निर्यातीचे उद्दिष्ट शक्य

''विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात भारतीय शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेचा अभिमान बाळगावा, अशी स्थिती आहे. या क्षेत्रात आपण मोठ्या निर्यातीचे उद्दिष्ट समोर ठेवू शकतो,'' असे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर यांनी सांगितले.

'सतीश धवन स्मृती व्याख्यान' गुंफताना 'रोल ऑफ इन्स्ट्रुमेंटेशन इन इंडियाज लाँच व्हेइकल्स' या विषयावर डॉ. गोवारीकर बोलत होते.

भारतीय बनावटीच्या प्रक्षेपकाच्या साह्याने भारताचा उपग्रह अवकाशात सोडला जावा, असे स्वप्न डॉ. विक्रम साराभाई यांनी पाहिले होते. हे स्वप्न भारतीय शास्त्रज्ञांनी प्रत्यक्षात आणले, उपग्रह अवकाशात कसा नेऊन सोडला जातो, याची चलत्चित्राच्या मदतीने पुणे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजीच्या (पीआयईटी) विद्यार्थ्यांना त्यांनी माहिती दिली.

आपल्या शिक्षण पद्धतीने घडविलेल्या शास्त्रज्ञांनी देशासाठी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मोठी कामगिरी केली आहे. क्रायोजेनिक इंजिनांची निर्मिती हे भारतीयांच्या बुद्धिमत्तेचे, जिद्दीचे व परिश्रमाचे उदाहरण आहे, असे त्यांनी सांगितले. अवकाश तंत्रज्ञानाला कधीही पूर्णविराम असणार नाही. सतत काहीतरी पुढे खुणावत राहील. सर्वसामान्यांची 'चंद्रावरील सहल' हे असेच एक स्वप्न आहे. कदाचित २०२० मध्ये ते प्रत्यक्षातही येईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### * मुघलकालीन कुराणाची प्रत विकल्याबद्दल तिघांना शिक्षा

सोनेरी शाईने मढविलेली मुघलांच्या राजवटीतील प्राचीन ठेवा असलेली

पवित्र कुराणाची हस्तलिखित प्रत बेकायदेशीररीत्या विकल्याच्या आरोपावरून तिघांना पुणे न्यायालयाने चार महिने तुरुंगवास व प्रत्येकी तीन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हा धर्मग्रंथ बादशहा औरंगजेब याने स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेला असल्याने तो अनमोल आहे. दख्खनच्या स्वारीत तिरुपती (आंध्र प्रदेश) येथील सरदाराने मदत केल्याच्या मोबदल्यात त्याला ही अनमोल भेट देण्यात आली होती. परंपरेने ती या घराण्यातील अब्दुल निसार अब्दुल अहमद यांच्याकडे आली. ती एखाद्या संस्थेला देणगीदाखल देण्याचा त्यांचा विचार होता. अहमद यांच्या औषधाच्या दुकानात काम करणाऱ्या दत्तात्रेयने अवघ्या ४५ लाख रुपयांत ती विकण्याचा सौदा केला होता. त्याची परदेशात तस्करी करण्याची योजना होती.

केंद्रीय यंत्रणेच्या विशेष तपास पथकातील निरीक्षक व्ही. के. शुक्ला हे प्राचीन वस्तू खरेदी करणारे ग्राहक बनले. त्यांना कुराणाची किंमत साठ लाख सांगितली. नंतर, त्यांच्यात ४५ लाखांवर तडजोड झाली. पुणे येथील एका हॉटेलात ही रक्कम घेताना त्यांना पकडण्यात आले.

### * 'दासबोध' जन्मोत्सव

शिवथरघळ, ता. महाड, जिल्हा रायगड येथे दर वर्षी नियमितपणे माघ शु. प्रतिपदा ते माघ शु. नवमीपर्यंत नऊ दिवस 'दासबोध' जन्मोत्सव साजरा केला जातो. या नऊ दिवसांत ग्रंथ पारायण, दैनिक उपासना, नामजप, प्रवचन, सायंप्रार्थना नियमित होतात. उत्सवकाळात रथसप्तमीच्या दिवशी सर्व उपासक सूर्यनमस्कारही घालतात नवमीच्या दिवशी 'दासबोध' पालखीची मिरवणूक निघते. पंचक्रोशातील ग्रामस्थही यात मोठ्या उत्साहाने भाग घेऊन 'दासबोध' ग्रंथाचा जन्मसोहळा साजरा करतात.

### * दलित साहित्याची धारा अधिक तेजस्वी

''दलित साहित्याची धारा नव्याने व अधिक तेजस्वी रूपाने प्रकट होत आहे,'' असे ज्येष्ठ समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांनी सांगितले. स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाचे ग्रंथपाल भि. अ. कांबळे यांनी लिहिलेल्या 'तत्त्वनिष्ठ कर्ण' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

प्रा. हातकणंगलेकर म्हणाले, ''श्री. कांबळे यांच्या या पुस्तकावरून दलित साहित्याची धारा नव्याने व अधिक तेजस्वी रूपाने प्रकट होत आहे, असे म्हणावे लागेल. दलित साहित्यात केवळ आत्मकथनपर साहित्य नाही; तर कथा, कादंबरी, दर्जेदार वैचारिक ग्रंथही लिहिले जात आहेत.''

कांबळे म्हणाले, ''महाभारतातील कर्ण हे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. या कर्णाची तत्त्वनिष्ठता महाभारतात पाहायला मिळते. त्याची तत्त्वनिष्ठतेची असंख्य उदाहरणे मला पांडवांच्या पराक्रमापेक्षा श्रेष्ठ वाटतात. त्यामुळे मी कर्ण



या व्यक्तिरेखेकडे अधिक आकर्षित झालो.''

रामायण, महाभारत हे आपले राष्ट्रीय काव्य असून, त्याचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे, असे मत डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. ''कर्णासाठी मैत्री हे एक मूल्य होते आणि तत्त्वही होते. महाभारतात कृष्ण-अर्जुन मैत्री तशी कर्ण-दुर्योधन मैत्रीही दिसते. कृष्ण-अर्जुन ही जोडी परिपूर्ण होती. मात्र कर्ण-दुर्योधन मैत्री तशी नव्हती. कारण दुर्योधन त्या मैत्रीला पात्रच नव्हता असे म्हणावे लागेल. कर्णाचा स्वभाव हा नेहमी तत्त्वनिष्ठेला महत्त्व देणारा होता.''

### * 'मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी पालकांवर'

''मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी पालकांवर व समाजावर आहे. आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी त्यांना मातृभाषेचे व श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व सांगण्याची गरज आहे,'' असे मत निवृत्त लेफ्टनंट जनरल डी. बी. शेकटकर यांनी महाराष्ट्र मिलिटरी फाउंडेशनच्या 'मराठी आघाडी' चे उद्‌घाटन करताना व्यक्त केले.

मराठी संस्कृतीचे हित जोपासणारे प्रशासन सत्तेत आणण्यासाठी या आघाडीची स्थापना झाली आहे. शेकटकर म्हणाले, भाषा भ्रष्ट झाल्यास तेथील संस्कृतीदेखील भ्रष्ट होते. पालकांनी मुलांवर लहानपणापासूनच इंग्रजी संस्कृतीचे शिक्षण लादल्यास मराठी संस्कृती बिघडणारच. मराठी संस्कृतीवरील या आक्रमणास सर्वस्वी आपणच जबाबदार आहोत.''

व्यवस्थापनतज्ज्ञ प्र. चिं. शेजवलकर म्हणाले, ''मराठी माणसात शौर्य आहे, लढण्याची ताकद आहे, फक्त गरज आहे ती त्यांना संघटित करून श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व सांगण्याची.'' विश्वास मेहेंदळे म्हणाले, ''आपल्या मुलाला सातासमुद्रापार पाठविण्याच्या ध्यासातच मराठी मानसिकता गुरफटून गेली आहे. तिला वास्तवाचे भान करून देणे आवश्यक आहे.''

### * पु. ल...अष्टपैलू; नव्हे बहुपैलू

''इतरांच्या गुणांचा व कार्याचा मुक्तकंठाने गौरव केल्यामुळे आपण लहान ठरू, अशी भीती पु. लं ना कधील वाटली नाही. त्यांच्या अथांग लोकप्रियतेमागे निष्कलंक चारित्र्य व नि:शब्द दातृत्व या गोष्टी होत्या,'' अशा शब्दांत कविवर्य विंदा करंदीकर यांनी पु. ल. देशपांडे यांचा गौरव केला.

'आशय सांस्कृतिक' तर्फे आयोजित दुसऱ्या 'पुलोत्सवा' चे विंदांच्या हस्ते २५ डिसेंबरला उद्‌घाटन झाले. कविवर्य मंगेश पाडगावकर अध्यक्षस्थानी होते. अष्टपैलू कलावंत असे म्हटल्याने पु.लं. वर थोडा अन्यायच होतो; कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आठ नव्हे तर चौदा अंगे आहेत, असे विंदांनी नजरेस आणून ते म्हणाले, ''प्राध्यापक, विनोदी लेखक, प्रवास-वर्णनकार, भाषांतरकार, रूपांतरकार, नाटककार, नट, नकलाकार, दिग्दर्शक, हार्मोनिअम वादक, वक्ता, शो-मन, दाता आणि रसिकाग्रणी असे पु. लं चे बहुआयामी व्यक्तित्व होते.

पु. ल. हे महाराष्ट्रातील सर्वश्रेष्ठ शो-मन आणि मराठी लेखकांतील सर्वश्रेष्ठ दाते होते. रसिकांनी त्यांच्यावर भरभरून प्रेम केले आणि 'पु.लं.'नीही कृतज्ञतापूर्वक त्याची परतफेड केली. या प्रेमाच्या चढाओढीत पु.ल. कांकणभर सरस ठरत असतील. तर त्याचे काही श्रेय सुनीताबाईंनाही द्यायला हवे.''

चांगला माणूस व मित्र हा पु.लं. चा पंधरावा पैलू आहे, असे सांगून पाडगावकर म्हणाले, पु. लं.ची आठवण येते. तेव्हा किस्से, कोट्यांपेक्षा त्यांच्यातील अत्यंत संवेदनशील माणूस दिसतो. आत कुठेतरी एकटा असल्याशिवाय माणूस कलावंत होत नाही. पु. ल. आत नुसते एकटे नव्हते: ते सर्जनशील एकटे होते. न पाचातले, न पंचविसातले... आम्ही आतले हो आम्ही आतले, असे पु. ल. होते.'' अभिरुचिसंपन्न, रसिक नागरिक घडविण्यासाठी 'पुलोत्सवा' सारखे कार्यक्रम नेहमी व्हावेत,अशी अपेक्षा प्रायोजकांनी व्यक्त केली.'आशय' चे सचिव सतीश जकातदार यांनी स्वागत केलं. वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविक केले.

### * बंधुता परिवार संमेलन

''समाजात शांतता निर्माण झाल्याखेरीज सामाजिक न्याय प्रस्थापित होणार नाही. शांततेसाठी बंधुतेची भावना वाढीला लावणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी पुणे येथे केले.

बंधुता परिवार अधिवेशनाचा समारोप करताना ते बोलत होते. नागनाथअण्णा नायकवडी, डॉ. भालचंद्र भागवत आणि संतसिंग मोखा यांना अनुक्रमे 'क्रांतिदूत','प्रज्ञावंत' आणि 'शांतिदूत' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

बंधुता संस्थेच्या कार्याचा गौरव करून श्री. दिब्रिटो म्हणाले, ''माणूस खूप आत्मकेंद्रित झाला की समाजाचा विनाश जवळ येतो. त्यामुळे स्वकेंद्रित माणसाच्या सामाजिक जाणिवा जागृत करणे, नैतिकता वाढविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सद्विचार वाढविणेही आवश्यक आहे. असे झाल्यास सकारात्मक जगणारी माणसे वाढतील आणि सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी पोषक वातावरणही निर्माण होईल.''

सामाजिक पातळीवर असलेल्या विषमतेमुळेच कुपोषण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. धर्मसंस्थेत आणि समाजसंस्थेतही अनेक नाठाळ लोक असल्याचे नमूद करून ते म्हणाले, ''अशांना मारण्यासाठी तुकारामांची काठीच हवी; मात्र मारणाऱ्या व्यक्तींत तुकारामांचे सत्त्व असायला हवे.''

### * लघुपट हा जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणारा फॉर्म

लघुपट (डॉक्युमेंटरी) हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असून ते निर्माण करणाऱ्याच्या या अनुभवातूनच आपले जीवन हे रसरशीत आणि समृद्ध होते. तोच 'पुलं' च्या जीवनाचाही यज्ञ होता. लघुपट महोत्सवातून आपण त्यास हातभार लावत आहोत, असे प्रतिपादन संगीतकार भास्कर चंदावरकर



यांनी केले. जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणारा लघुपट असतो. पण जादू आणि यथार्थतेचे मिश्रण असणारा करमणूकप्रधान सिनेमा हा नंतर येऊनही तोच खरा सिनेमा असे मानले जाऊ लागले!

फलाटावर येणाऱ्या रेल्वेचे चित्रण करून लुम्यियेर बंधूंनी पहिला लघुपटच १८८५ मध्ये निर्माण केला होता, असे चंदावरकर यांनी सांगितले. तत्कालीन वास्तवाचे दस्तऐवजीकरण तसेच त्यातील हव्या त्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करून त्याचे प्रत्यंतर लघुपटातून घडवले जाते. म्हणूनच स्वतंत्र बुद्धीच्या लघुपटकारांचे हे काम राजकर्त्यांना न पटणारे असते!

जर्मन नाटककार ब्रेश्तचे वचन देऊन चंदावरकर म्हणाले की, गोष्टी बऱ्याच साध्या असतात, पण त्या बघणे हे व्यामिश्र असते, कारण जे दिसते तेवढेच नसते! जगातील कलावंतांनी उत्तमोत्तम लघुपट बनवले आहेत, म्हणून अशा लघुपट महोत्सवांना वेगळे महत्त्व आहे. यातूनच समाजाकडे आणि आपल्या काळाकडे पाहण्याची दृष्टी मिळते. लघुपट निर्मितीचे काम लेखनापेक्षाही महत्त्वाचे आहे.

### * इस्त्रायल गुन्हेगारांच्या 'डिक्शनरी' त हिंदी शब्द!

इस्त्रायलमधील गुन्हेगार सातत्याने जे शब्द वापरतात त्या शब्दांची 'डिक्शनरी' पोलिसांनी प्रकाशित केली आहे, आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यात 'चरस', 'गांजा' आणि 'चिलिम' इत्यादी हिंदी शब्दही आहेत.

शब्दकोशातले अनेक शब्द हिंदी, इंग्रजी आणि अरेबिक भाषांतील असल्याची माहिती पोलिस प्रमुख ओरिट हेमॅन यांनी दिली. शब्दकोशात 'ड्रग' ला फ्रेंच शब्द 'स्पीड', 'ग्रास' आणि 'क्राइस' असे दिलेले आहेत, तर अरेबिकमध्ये 'हशीश', 'केफ' आणि 'सतुल' म्हटले जाते हिंदीमध्ये 'चरस', 'गांजा' म्हणून हे ड्रग्ज ओळखले जातात याचा विशेष उल्लेख केलेला आहे. गुन्हेगारांकडून ज्या प्रकारचे शब्दप्रयोग केले जातात त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व पुढे येते. या शब्दांचे अर्थ समजल्यामुळे पोलिसांना गुन्हेगारांच्या गुप्त कटकारस्थानांची माहिती मिळू शकेल, असे हेमॅन यांना वाटते. या शब्दांचा उपयोग करून पोलिसांना गुन्हेगारांमधील संभाषणाचा अर्थ लावता येईल. ८०० शब्दांचा हा शब्दकोश संगणकावरही उपलब्ध आहे.

### * कवतुके मराठी बोलण्यासाठी...

शहर आणि परिसरात कार्यरत असणाऱ्या बँकांमध्ये होणाऱ्या व्यवहारांत इंग्रजी शब्दाऐवजी मराठी शब्द वापरण्यात यावेत म्हणून समर्थ मराठी संस्थेचे संचालक अनिल गोरे विविध बँकांमध्ये जाऊन सध्या जागृती करत आहेत.

बहुतेक बँकांमध्ये हल्ली मोठ्या प्रमाणात इंग्रजी शब्द वापरण्यात येतात. त्या इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द उपलब्ध करून देणारे एक पत्रक समर्थ मराठीतर्फे

तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये टर्म-मुदत, कॉनफिस्केशन-जप्ती, क्लियरींग-वटाव, कॅशक्रेडिट-रोखपत अशा शब्दांचा समावेश आहे. संपर्क - प्रा. अनिल गोरे, समर्थ मराठा संस्था, द्वारा- पशुपक्षी औषधालय, ७०५ बुधवार, पुणे २.

## * गदिमांच्या गावीच त्यांच स्मृती उमलणार

'आधुनिक वाल्मिकी' म्हणून ओळखले जाणारे ग. दि. माडगूळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त एक 'मेगा इव्हेंट' गदिमांच्या खुद्द जन्मगावी म्हणजे माणदेशातील माडगूळ येथेच २००५ मध्ये आयोजित करण्यात आली.

भावगीते, मराठी चित्रपटगीते तसेच 'गीतरामायण' यासारख्या काव्याने अवघ्या मराठी मनाला मोहून टाकणाऱ्या या बहुआयामी कवीची नाळ माणदेशालाच जोडली गेली आहे. म्हणूनच तेथे त्यांच्याबद्दलच्या आठवणींना 'माडगुळ्याचे गदिमा' या कार्यक्रमाद्वारे उजाळा देण्यात आला! तेथील 'बामनाचा पत्रा' या ठिकाणी गदिमांना अनेक अविस्मरणीय गीते स्फुरली असल्याचे सांगण्यात येते!

ई-टीव्हीच्या मराठी विभागाचे प्रमुख संजय दाबके यांच्या कल्पनेतून 'माडगुळ्याचे गदिमा' साकार झाले असून त्याचे दूरदर्शनवरून प्रक्षेपणही करण्यात येईल. गदिमांची अनेक गाणी गाणाऱ्या प्रसिद्ध गायिका आशा भोसले तसेच संगीतकार श्रीधर फडके आणि अनेक मान्यवर यात सहभागी झाले होते.

'माडगुळ्याचे गदिमा' ची संहिता आणि दिग्दर्शन सुधीर मोघे यांचे आहे. स्वरानंद संस्थेतर्फे 'मंतरलेल्या चैत्रबनात' या ३० वर्षांपूर्वी त्यांच्या उपस्थितीत आयोजित केला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर पैलू 'माडगुळ्याचे गदिमा' तून दाखवण्यात आले आहेत.

गदिमांचे गद्यलेखन, पटकथा लेखन, ललित लेखन आणि अभिनय. यातून एका प्रतिभासंपन्न आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यात आला आहे.

गदिमांचे सर्वात धाकटे बंधू शाम माडगूळकर तेथे राहातात. गदिमा आणि व्यंकटेश माडगूळकरांचा दबदबा तेथेही कायम असल्यामुळे या कार्यक्रमाला ग्रामीण रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## * पुस्तकांना वाहून घेतलेली माणसे आदरणीय : बोधे

जीवनात ग्रंथांना फार महत्त्व आहे. पुस्तकांना वाहून घेतलेली माणसेच आदरणीय असतात, असे मत ज्येष्ठ कादंबरीकार व बा. बोधे यांनी व्यक्त केले.

सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ३२ वे अधिवेशन शिवछत्रपती वाचनालयानजीकच्या सभागृहात संपन्न झाले. श्री. बोधे म्हणाले, ''समाजाने ग्रंथपालांबद्दल आदर राखला पाहिजे. समाजाच्या ज्ञानाची भूक भागविण्यास ते उत्सुक असतात. म्हणूनच ग्रंथपालांचा आपण आदर केला पाहिजे.'' मराठी साहित्यात आता खूप स्पर्धा वाढली आहे. १९७० नंतर तरुण लेखकांची पिढी साहित्य क्षेत्रात अवतरली आणि प्रस्थापितांना धक्का बसला ''सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून मी लिहित राहिलो. ग्रामीण भागात आणि कोठेही फिरताना वास्तवाचे भान ठेवून माणसे वाचता आली पाहिजेत, तरच वास्तव लिखाण होते.''

सध्या माणसे वाचत नाहीत याचे खापर आपण दूरदर्शनवर फोडतो. किती माणसे वाचतात हाही संशोधनाचा विषय आहे. शिक्षक आणि प्राध्यापकांनीही वाचले पाहिजे. उत्तमोत्तम पुस्तके वाचली, तरच गावोगावी कवी आणि लेखकांची फळी उभी राहील. ग्रामीण भागातील वाचनालयात अंतर्मुख आणि अस्वस्थ करणारी पुस्तके ठेवली पाहिजेत. ग्रंथालय सेवकांच्या वेतनाचे प्रश्न सुटले पाहिजेत, विविध लेखकांच्या कथा, कांदबऱ्यामधून आपणास स्फूर्ती मिळाली असे त्यांनी सांगितले. प्रारंभी डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी जिल्हा ग्रंथालय संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

## * शब्द नि:शब्दही करतात

''ज्या वयात घडायचे, त्या पोरवयात कविवर्य बोरकर, कुसुमाग्रज आदी दर्जेदार कवींमुळे मला सकस 'शब्दां'ची ओळख झाली. या विद्वान मंडळींमुळेच मी शब्दांनी झपाटलो. हे शब्द मला परमोच्च आनंद देतात. इतकेच काय, पण हेच शब्द कित्येकदा आपल्याला नि:शब्दही करतात, हे मला लहान वयातच उमगले...'' असे प्रवीण दवणे यांनी सांगितले. आशय सांस्कृतिक कट्ट्यातर्फे प्रा. दवणे यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

या वेळी आपल्या उमेदवारीच्या दिवसांमधील धडपड, संघर्ष, कवी, गीतकार म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी पार पाडावे लागलेले विविध टप्पे, आयुष्याच्या विविध वळणावरील चांगल्या-वाईट आठवणी उलगडून दाखवल्या.

ते म्हणाले, ''आपली कारकीर्द वेळीच सुरू करणे फार महत्त्वाचे असते. तसेच आपल्या कारकिर्दीतील उमेदवारी कधीच संपू न देणेही तितकेच महत्त्वाचे असते. कारण उमेदवारी संपणे म्हणजे आपली वाटचाल संपणे. कोणतेही उद्दिष्ट साध्य करताना चढ-उतार हे येतातच. तुम्हाला तुमचे ध्येय प्राप्त करण्यासाठी लागलेला ध्यास ही एक प्रकारची धुंदीच असते.''

## * पालकांनीच लावावी मुलांना मराठी साहित्याची गोडी!

'लहान मुलांच्या मनात मराठी साहित्याबद्दल आस्था निर्माण करण्याची जबाबदारी पालकांची आहे. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून बालसाहित्याविषयी जागरूकता निर्माण होऊ शकेल', अशी अपेक्षा १८ व्या बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा गिरीजा कीर यांनी व्यक्त केली. कऱ्हाडच्या प्रीतीसंगमावरील यशवंतराव चव्हाण नगरात आयोजित या संमेलनाचे स्वागताध्यक्ष खा. श्रीनिवास पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे जलसंसाधनमंत्री रामराजे नाईक निंबाळकर उपस्थित होते.

'माझ्यासारख्या छोट्या लेखिकेला अध्यक्षपदाची जबाबदारी पेलवणार नाही, असे वाटून सुरुवातीला आपण हे पद नाकारले होते. पण लहान मुलांच्या सहवासात काही क्षण घालवण्याची संधी मिळणार म्हणून मी आले', असे कीर म्हणाल्या. पुण्या-मुंबईतले विद्यार्थी हिंदी-इंग्रजी शब्द रोजच्या बोलण्यात वापरतात. तेव्हा त्यांचे शिक्षक आणि पालक अगदी गप्प बसतात. मग मुलांना लहानपणापासून मराठीची गोडी न लावल्याबद्दल या पालकानांच जबाबदार धरण्यात यावे, अशी टीका त्यांनी केली.

मराठी साहित्यिकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून साहित्य 'इ-बुक' म्हणून बालवाचकांपर्यंत पोचवले पाहीजे, असे प्रतिपादन करून ना. निंबाळकर म्हणाले : यामुळे लहान मुलांना त्याची पटकन गोडी लागेल. साहित्य संमेलनाला २५ लाखांची मदत सरकारकडून दिली जाते. तशी स्थायी मदत बालसाहित्य संमेलनालाही मिळावी, यासाठी गिरीजा कीर यांना बरोबर घेऊन प्रयत्न करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

संमेलनाला आ. उल्हास पवार, बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे अध्यक्ष शंकर सारडा, भैय्या वैद्य, श्रीधर राजगुरु, महावीर जोंधळे, शकुंतला फडणीस प्रभृती उपस्थित होते.

### * सल असेल तरच अस्सल निघते - फ. मुं. शिंदे

''सल असेल तरच अस्सल निघते. अस्सल असेल तिथेच प्रतिभा असते. शब्द हे प्रथम काळजात असतात. मग ते कागदावर उतरतात आणि त्यातूनच हृदयाला भिडणाऱ्या साहित्याची निर्मिती होते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी फ. मुं. शिंदे यांनी केले. ९ जानेवारी रोजी झालेल्या नगर जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्री. शिंदे बोलत होते. उद्घाटन ग्रामीण कथाकार नामदेवराव देसाई यांच्या हस्ते झाले.

श्री. शिंदे म्हणाले, ''लेखक आणि कवीचे लिखाण हे काळजाला भिडणारे असायला हवे. त्याच्या शब्दांमध्ये आग असेल, तरच ते साहित्य लोकांच्या मनावर बिंबते.'' छोट्या व मोठ्या साहित्य संमेलनामध्ये भेद करणे योग्य नाही, असे मत व्यक्त करून ते म्हणाले की, समुद्राच्या पाण्यात आणि डबक्यातल्या पाण्यातही सूर्याचे प्रतिबिंब पडते. त्यामुळे त्यात फरक करण्याचे काहीच कारण नाही.

साहित्य हे प्रचारासाठी नसून, प्रबोधनासाठी आहे. मनुष्यसुखाचा आविष्कार साहित्यामधूनच होत असतो. संमेलने ही मोठी संस्कारयात्राच आहे. साहित्य संमेलनात संवाद जर घडत नसतील, तर संमेलने घेण्याची गरजही भासली नसती, असे ते म्हणाले.



उद्घाटनपर भाषणात श्री. देसाई म्हणाले, ''शेतकऱ्यांचे पुत्र म्हणविणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून ग्रामीण भागातील प्रश्न गेल्या ५० वर्षांत सुटू शकलेले नाहीत. ते सोडविण्याचे धाडसही त्यांनी दाखविलेले नाही. त्यामुळे ते शेतकऱ्यांचे पुत्र आहेत की नाही, हे आता तपासावे लागणार आहे.'' सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याची ताकद फक्त साहित्यिकांच्याच लेखणीत आहे, असे सांगून ते म्हणाले की, साहित्यिकांनी इतरांना जागवण्याची कला साध्य करायला हवी. ग्रामीण भागातील लोकांचं जगणं, त्यांचे प्रश्न अजून व्यवस्थित मांडले गेलेले नाहीत. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम लेखक-कवींनी करायला हवे.

संमेलनाच्या प्रारंभी ग्रंथदिंडी काढण्यात आली. मनोरंजन उरणे, बाबासाहेब सौदागर, ज्ञानेश आकसाळ, देवदत्त हुसळे, रामदास भालेराव, धनराज भन्साळी आदी मान्यवर या ग्रंथदिंडीत सहभागी झाले होते. ओम गुरुदेव शैक्षणिक संकुल, सेवा निकेतन चक्रधर स्वामी विद्यालय, तसेच श्री. गो. विद्यालयाचे विद्यार्थी लेझीम पथकासह मिरवणुकीत सहभागी झाले होते.

ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे ग्रंथालय संचालक मो. मु. मेश्राम यांच्या हस्ते झाले. प्रा. विनायक बंगाळ यांच्या 'मुके जाते गाणे गाते' व 'बुडती हे जन' या पुस्तकांचे, तसेच 'दृष्टांत' या स्मरणिकेचे प्रकाशन झाले.

### * तथाकथित बुद्धिवंतांनी जबाबदारी पार पाडली नाही : ढसाळ

स्वातंत्र्याची अपेक्षा करणाऱ्या तथाकथित बुद्धिवंतांनी त्यांच्या नैतिक जबाबदाऱ्या पार न पाडल्याने आपण ब्रिटिशांच्या गुलामगिरीत अडकून पडलो होतो, असे विचार साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त, कवी नामदेव ढसाळ यांनी सांगली येथे व्यक्त केले.

लोकरंगभूमी आणि शांतिनिकेतन लोकविद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री. ढसाळ म्हणाले की, माझं मन निखाऱ्यावरून चालत असल्याने ते प्रकृतीचा संदेश मानत नाही. प्रबोधनापेक्षा कृतीची गरज आहे. पठ्ठे बापूराव यांनी रंगभूमीचा स्वर्णइतिहास लिहिला आहे. आपला इतिहास हा दडपलेल्या रांजणासारखा आहे. शिवरायांच्या चारित्र्याचे हनन चालले आहे. पूर्वी मी जेव्हा आईच्या सांगण्यावरून भाकरी मागायला जात होतो, तेव्हा शिव्याशापाव्यतिरिक्त अधिक काही पदरी पडायचे नाही. सहकारात किती प्रस्थापित व किती विस्थापित झाले, ते पहा. आईने अत्यंत कष्टाने आम्हाला वाढविले. सध्या होत असलेलं समाजकारण पोखरलेलं आहे. आपल्या देशाचा इतिहास हा पराभवाचा इतिहास आहे. आपल्या देशामध्ये स्वातंत्र्यानंतर ८०० प्रमुख जाती व ५००० पोटजाती आहेत. दोन-चार लेखक सोडल्यास मूलगामी लिखाण

कोणीही केले नाही. साहित्याचा प्रचार योग्य पद्धतीने व्हायला हवा.

लेखक म्हणून सत्कार करून घेण्यात मी कधीच गुंतलो नाही. आंबेडकर सर्व पातळीवर एकाकी लढले. त्यांच्या विचारांचे निष्कर्ष योग्य पद्धतीने काढले पाहिजेत. या भारताला सर्व क्षेत्रात बलशाली करावयाचे असल्यास येथील जाती-व्यवस्था तोडली पाहिजे. या देशात अनेक कायदे दलितांविरुद्ध आहेत. कित्येकजण छुप्या पद्धतीने सहकार चळवळीला विरोध करीत असतात. सहकार क्षेत्रामध्ये वसंतदादांची पुण्याई जाऊन, नको त्या लोकांचे महत्त्व वाढू लागले आहे, हे पाहून मनाला अतिशय वेदना होतात. आमच्या लोकांनी त्यांच्या मूळ प्रश्नांकडे लक्ष न देता ब्राह्मणांना शिव्या घालण्यापलीकडे दुसरा उद्योगच केला नाही. खऱ्या अर्थाने सामाजिक सुधारणांचे 'स्टार्टर' हे ब्राह्मणच आहेत. वैचारिक समज असणारे लोक उरलेच नाहीत. खासगी उद्योग-धंद्यांनी या देशाचा नाश केला. आपल्या राज्यकर्त्यांनी प्रयोग करण्याशिवाय दुसरा उद्योग केला नाही. सामाजिक लोकशाहीची नितांत आवश्यकता आहे. जातीयवादाची लढाई विशिष्ट जातीलाच संघटित करून जिंकता किंवा लढता येत नाही. आपली लोकशाही भांडवली आहे. आंबेडकरांनी ज्या दिवशी घटना लिहिली, त्याच दिवशी दलित चळवळींचे उद्दिष्ट संपले.''

प्राचार्य पाटील म्हणाले: आपले स्वातंत्र्य हे राजकीय स्वातंत्र्य आहे. सामाजिक व आर्थिक डोंगर चढायचे आहेत. राजकीय क्रांती म्हणजे सर्व काही, असे समजले जाते. महात्मा फुले यांनी याला मानसिक गुलामगिरी म्हटले आहे. सामाजिक क्रांती घडली पाहिजे. सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्यांची संख्या फारच कमी आहे.

❐


**विज्ञान प्रपंच**




**डॉ. बाळ फोंडके**

दैनंदिन जीवनातल्या विविध घटनांमधील विज्ञान उलगडून दाखवणाऱ्या दिलखुलास गप्पा

**किंमत : १५०रु. सभासदांना : १०५ रु.**
**पोस्टेज : २०रु.**




# साहित्य संमेलने आणि ग्रंथ महोत्सव यांचा सांस्कृतिक जागर

**शंकर सारडा**

डिसेंबर-जानेवारी हे महिने इथे मराठीचिये नगरी 'संमेलनपर्वा'चे आणि जत्रा-उत्सवांचे त्यातल्या त्यात डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून पुढचे पाच आठवडे-विशेषच गजबजीचे असतात. दर आठवड्याच्या शनिवार-रविवारी तऱ्हेतऱ्हेची संमेलने भरतात. निरनिराळ्या गावी असतात. त्यामुळे कुठे जावे आणि कुठे जाऊ नये तसे अशी रसिकांची द्विधा मन:स्थिती होते. हा जानेवारीही त्याला अपवाद नाही. १-२ जानेवारीला जागतिक मराठी अकादमीचे संमेलन खा. यशवंतराव गडाख यांनी अहमदनगरला घेतले. त्याच दिवशी सातारला ग्रंथ महोत्सव होता. नागपूरला ग्रंथ उत्सव होता. पुढच्या वीकएण्डला कऱ्हाडला १८ वे अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलन प्रीतिसंगमावर भरले; तर ठाणे येथे माधव गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली कोकण मराठी साहित्य परिषदेचे नववे अधिवेशन झाले. १२ जानेवारीला सिंदखेड राजा (बुलढाणा) येथे मराठा सेवा संघातर्फे जिजाऊ जन्मोत्सव आणि शिवधर्म दीक्षासमारंभाचा जंगी सोहळा झाला. १४ जानेवारीला औदुंबर साहित्य संमेलन-अध्यक्ष नामदेव ढसाळ. पंधरा-सोळा जानेवारीला खेड (रत्नागिरी) येथे म.सा. परिषदेचे ११ वे विभागीय साहित्य संमेलन...१७-२८-२९ जानेवारीला नाशिकला अ.भा.मराठी साहित्य संमेलन तर डोंबिवलीला नाट्यसंमेलन...महिनाभर ग्रंथप्रेमी, रसिकांना एकीकडे पर्वणी तर दुसरीकडे इकडे जावे की तिकडे-अशी टोचणी. सगळीकडे तर जाता येत नाही. त्यामुळे कुचंबणा होते. पण त्यातल्या त्यास सध्या एक बरे आहे. ई-टीव्हीमुळे या सगळ्या संमेलनांचे विस्तृत वृत्तांत घरबसल्या आरामात बघायला मिळतात. पूर्वी दूरदर्शनची मक्तेदारी होती. तेव्हा अधिकाऱ्यांना मनवण्यासाठी अर्थपूर्ण मार्ग चोखाळण्याची संयोजकांची तयारी असेल तरच दूरदर्शनवरून संमेलनाबद्दलच्या बातम्या येत. एरव्ही दूरदर्शनचे सफाईदार मौन असे. ई-टीव्हीच्या जागरूक अधिकाऱ्यांनी दूरदर्शनची चांगलीच जिरवली आहे. त्यामुळे रसिकांना साहित्यकलांचा आस्वाद घेणे सुलभ झाले आहे. दूरदर्शनच्या नोकरशाही चौकटीला कधी जाग येईल असे वाटत नाही.

-तर सांगायचा मतलब हा की जानेवारीमध्ये साहित्य संमेलनांचे आणि

ग्रंथोत्सवाचे सोहळे रंग असतात आणि रसिकांना खुलवत असतात. रंजनाबरोबर थोडाफार प्रबोधनाचाही खुराक देत असतात. नव्या जुन्या लेखकांना व्यासपीठावर मिरवता यावे अशी व्यवस्थाही करीत असतात. कोणाचा किती भाव हेही जोखून बघत असतात. संमेलनांना जोडून भरणाऱ्या वा स्वतंत्र, ग्रंथप्रदर्शनांनाही आता उत्तम प्रतिसाद मिळत असतो. सातारला यंदा सहावा ग्रंथ महोत्सव १ ते ४ जानेवारी या काळात झाला. पन्नासावर पुस्तकांचे स्टॉल होते. सकाळी ९ ते रात्री १२ पर्यंत विक्रेत्यांना जेवायचीही उसंत नव्हती. इतकी गर्दी! बिलांसाठी रांगा लागताहेत, असे दृश्य सरसहा दिसत होते. ग्रंथमहोत्सवाला जोडून ग्रंथदिंडी, परिसंवाद, कथाकथन, काव्यवाचन, वगैरे रंजक कार्यक्रम शिवाय शेवंतीचे बन (चंद्रकांत काळे), प्रेयसीच्या शोधात (अनिल पारगावकर), यासारखे आकर्षक कार्यक्रम. त्यामुळे रसिकांची लक्षणीय गर्दी. ह. मो. मराठे, संजीव खांडेकर, व. बा. बोधे, प्रभृतींची उपस्थिती. भरपूर वैचारिक आदानप्रदान. वाचन संस्कृती वाढवण्याचा हा उपक्रम. मोठमोठी ग्रंथालये गावात असताना घरी ग्रंथालय कशाला? या प्रश्नाचे उत्तर जे दिले गेले ते सर्वांनाच हरवेल असे होते. मोठमोठी मंदिरे गावात असतानाही घरी देवघर असतेच ना! तसेच ग्रंथांचे! घरी पुस्तकांचा एक कोपरा असलाच पाहिजे. हा विचार सातारकरांना पुरेपूर पटला असावा. त्याचीच साक्ष पुस्ताकांच्या स्टॉलवर असलेल्या गर्दीद्वारे मिळत होती.

कराडला दि. ६ ते १० जानेवारी या दरम्यान ग्रंथ संमेलन घेण्यात आले. त्याचा लाभ चाळीसावर विक्रेत्यांनी घेतला. साताराएवढी विक्री मात्र तेथे झाली नाही. स्टॉलवर गर्दीही तेवढीशी दिसली नाही. परंतु यंदाचे हे पहिलेच वर्ष; त्यामुळे जो मिळाला तो प्रतिसाद ही उत्साहवर्धक ठरावा. नखशिखांत गोषा घेतलेल्या महिलाही स्टॉलवरची पुस्तके न्हाहाळून बघताना दिसत होत्या तेव्हा अशा ग्रंथप्रदर्शनांची महतीही आपोआप ध्यानी येत होती! आपला वाचकवर्ग खूप मोठा आहे, वेगवेगळ्या सामाजिक स्तरामधला आहे. फक्त त्याच्यापर्यंत आपण पोचायला हवे. ग्रंथप्रदर्शन हे त्यासाठी सर्वोत्तम चॅनेल ठरू शकते.

**बालकुमार साहित्य संमेलन :**

कराडतालुका मराठी पत्रकार संघ आणि शिक्षण महिलामंडळ महाविद्यालय यांनी आयोजित केलेले १८ वे अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलन कऱ्हाड येथेच ख्यातनाम लेखिका गिरिजा कीर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८-९ जानेवारी रोजी संपन्न झाले. 'ज्ञानियांचा वा तुक्याचा तोच माझा वंश आहे, माझिया रक्तात काही ईश्वराचा अंश आहे' या शब्दांनी आपणास दिवा दाखवला, त्या ईश्वरी अंशाला स्मरून आपण या अध्यक्षपदाचा स्वीकार केला; इथं निवडणुका नाहीत, मतांचा जोगवा मागायचा नाही, आपल्यासाठी कुणाला नाव मागं घेण्याचा त्यागही करायचा नाही.' आपल्या लेखणीचा आदर करणाऱ्या या अध्यक्षपदाचा



सन्मान गिरिजाबाईंना मोहरून टाकणारा वाटावा यात आश्चर्य नाही. एका अपघातामुळे त्यांच्या चालण्याबसण्यावर मर्यादा होत्या. परंतु त्यांनी आपल्या सौहार्दपूर्ण आणि मनमोकळ्या भाषणाने सर्वांना अंतर्मुख केले.

''आज काळजी वाटत असेल तर ती बालवाङ्मयापुरती नको, उद्याच्या मराठीबद्दल वाटायला हवी'' असे सांगून आजची मुले मातृभाषेपासून, वाचनापासून, संस्कारापासून दूर चालली आहेत; त्याच्या कारणांची नोंद करताना, दूरदर्शन, कॉमिक्स, क्रिकेट, पोटार्थी आईवडील, विभक्त कुटुंब, चंगळवादाचा प्रभाव, मराठी विषयीची अनास्था, इंग्रजीचं वेड, मराठीला भवितव्य नाही (नोकरी, आर्थिक स्थैर्य, करीयर, परदेशवास्तव्य) वगैरे कारणांचा त्यांनी उल्लेख केला तरीही मुलांमधील वाचनाची ओढ कायमच राहणार कारण त्यांच्या विश्वाला स्पर्श करून त्यांची स्वप्नसृष्टी जागी करणारं वाङ्मय त्यांना आवडते; हेही त्यांनी स्पष्ट केले. मुलांची मने जाणणारे लेखक हवेत. पुस्तकात सुंदर अर्थपूर्ण चित्रे हवीत, साधी सोपी भाषा हवी. आजही हॅरी पॉटरवर उड्या पडतात. ॲलिस इन वंडरलँड, गलिव्हर्स ट्रॅव्हल्स, डॉन क्विक्झोट वाचले जातात. आपल्या पुराणकथांमध्येही खूप चमत्कार आहेत. नीतिमूल्ये आहेत. हे सर्व नव्या पिढीपर्यंत पोचवायला हवे; असे आवाहन त्यांनी केले. उद्घाटनाच्या वेळी आमदार उल्हास पवार, मंत्री रामराजे निंबाळकर, खासदार श्रीनिवास पाटील यांचीही खुसखुशीत भाषणे झाली.

या समेलनात कथाकथनाची दोन सत्रे होती. त्यात दत्ता टोळ, हरिहर आठलेकर, शुभदा साने, गोविंद गोडबोले, सुनीता नागपूरकर, मुकुंद निगवेकर, नीलम माणगावे, उज्वला केळकर, श्याम कुरळे, वसंत निगवेकर, शशिकांत महाडेश्वर, श्रीनिवास शिंदगी, प्रभृतींनी भाग घेतला. काव्यवाचनात डॉ. नीलिमा गुंडी, श्रीकांत कुलकर्णी, डॉ. सौ. निर्मला सारडा, रजनी हिरळीकर, किशोर पाठक, दत्ता टोळ, आश्लेषा महाजन, देवीदास फुलारी, माधव चुकेवाड, स्नेहसुधा कुलकर्णी, नीलम माणगावे यांनी बहार आणली. त्याशिवाय चार परिसंवादांमधून जिव्हाळ्याचे विषय हाताळले गेले.

आजच्या मुलांच्या दृष्टीने बालसाहित्यात नवे काय हवे, बालसाहित्याची समीक्षा कशी होते आणि कशी व्हायला हवी? बालसाहित्यातील नवे प्रयोग आणि पुस्तकांसंबंधी शासकीय योजना व विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या गरजा असे चार विषय होते; त्यातील विचारमंथनातून अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या आणि भावी बालसाहित्याची दिशा गवसल्याची कबुलीही अनेक उपस्थितांनी दिली. ''बालसाहित्य हे खरे विश्वसाहित्य आहे. बालपणी रामायण महाभारत, इसापच्या कथा, पंचतंत्र, ग्रीक-रोमन पुराणकथा, ग्रिम बंधू व हॅन्स अँडरसनच्या परीकथा, अरेबियन नाइट्स, बिरबल-तेनालीराम-नसरुद्दिनच्या चातुर्यकथा, वगैरे मुले वाचतात.

त्यातून निरनिराळ्या देशांच्या सांस्कृतिक वारशाची ओळख होते. त्यातून विश्वसाहित्याची ओळख होते आणि आपण विश्वाचे नागरिक बनतो. पुस्तकाद्वारे रंजन होते तसेच ज्ञानही मिळते. बालसाहित्य हे वयोगटाप्रमाणे हवे; ते सर्वात जास्त खपणारे व आर्थिक उलाढाल असणारे क्षेत्र आहे अशी प्रारंभिक भूमिका अ.भा.बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे अध्यक्ष शंकर सारडा यांनी मांडली. आजच्या टी.व्ही-इंटरनेटच्या जमान्यात मुले बहुश्रुत असतात; हुशार असतात. त्यांना आकृष्ट करील असे बालसाहित्य हवे यावर बहुतेक वक्त्यांनी भर दिला. बालमानसशास्त्र त्यासाठी अवगत हवे; आणि वयोमानानुसार तसेच ग्रामीण-शहरी मानसिकता लक्षात घेऊन ते लिहिले गेले पाहिजे याकडेही महावीर जोंधळे, पु. ग. वैद्य, हरिहर आठलेकर, मुंकुंद निगवेकर, वगैरे वक्त्यांनी लक्ष वेधले. नवी संवेदनशीलता यायला हवी, भावनांचा पुरेशा प्रमाणात पारपोष व्हायला हवा, असे रजनी हिरळीकर यांनी सांगितले.

बालसाहित्याची योग्य प्रकारे समीक्षा होत नाही याबद्दलही बहुतेक वक्त्यांचे एकमत होते. एकूण साहित्याच्या परिप्रेक्ष्यातच बालसाहित्याची समीक्षा व्हायला हवी. आजची वृत्तपत्रीय समीक्षा जुजबी व वरवरची असते असे विश्वास वसेकर म्हणाले. बालसाहित्याला ताकदीचे समीक्षक लाभलेले नाहीत असे मत प्रशांत गौतम यांनी व्यक्त केले.

शासकीय पुस्तक खरेदीच्या खडूफळा वगैरे योजनांमधील भ्रष्टाचाराचा समाचार एका परिसंवादात घेण्यात आला. त्यात अनिल मेहता, अरुण जाखडे, शरद गोगटे, प्रभाकर देसाई या प्रकाशकांनी परखड मते मांडली. मुलांचा वाचनाचा हक्क हिरावून घेण्याचा हा प्रयत्न असल्याची तक्रार त्यांनी केली.

-हजारो मुलामुलींच्या उपस्थितीने या बालसाहित्यसंमेलनाचा सोहळा संस्मरणीय ठरला.


**मुलांनी वाचलीच पाहिजेत,**
**किंवा पालकांनी मुलांना वाचून**
**दाखवली पाहिजेत, अशी संस्कारक्षम पुस्तके**




**वि. स. खांडेकर**

| | |
|---|---|
| सूर्यास्त | ३०रु. |
| यज्ञकुंड | ३०रु. |
| मध्यरात्र | ४०रु. |
| घरटे | ३०रु. |
| अस्थी | ३०रु. |

पोस्टेज प्रत्येकी २०रु.





## पुस्तक परिचय

# वसुंधरा

**निरंजन घाटे**

**या आपल्या पृथ्वीच्या पोटात दडलंय काय?**




इ. स. दोन हजार चार हे वर्ष संपता संपता पुन्हा एकदा निसर्गाने आपला झपाटा दाखवला. इंडोनेशियाजवळच्या समुद्रात प्रलयकारी भूकंपामुळे प्रचंड लाटा -त्सुनामी- निर्माण झाल्या आणि त्यांच्या कचाट्यात सापडलेल्या श्रीलंका, थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, भारत वगैरे देशातील समुद्रकिनाऱ्यावरील हजारो जीवांचा बळी गेला. मालमत्तेची प्रचंड हानी झाली. या सागरी भूकंपाची तीव्रता ८.९ रिश्टर एवढी होती.

-आणि पुन्हा एकदा निसर्गाच्या अस्मानीसुलतानीपुढे आपण क:पदार्थ आहोत, हतबल आहोत याची मानवजातीला जाणीव झाली. ज्या पृथ्वीवर आपण राहतो, त्या पृथ्वीच्या पोटात काय दडलेले आहे ते आपल्याला फार थोडे ज्ञात आहे. जे अज्ञात आहे ते खूप अवाढव्य आहे. प्रलयकाळाच्या, जगबुडीच्या कथादंतकथा आपण पिढ्यान्‌पिढ्या ऐकत आलो आहोत; त्याची थोडीशी चुणूक त्सुनामी लाटांनी दाखवली. कधी काळी निश्चितच भयंकर प्रलय होऊन अनेक बेटे आणि भूभाग पृथ्वीच्या पोटात गडप झालेले असणार, संस्कृतीच्या संस्कृती त्यामुळे नष्ट झाल्या असणार हे लक्षात येऊ लागते; त्यावर विश्वास बसू लागतो.

पृथ्वी नामक या ग्रहावर मानवप्राणी जन्माला आला आणि तो आता पृथ्वी ज्या सूर्यमालेचा एक छोटासा ग्रह आहे त्या अनंत विश्वाची माहिती मिळवण्यासाठी अंतरिक्षायानांचा, उपग्रहांचा वापर करण्याएवढा तंत्रकुशल बनला आहे; आणि पृथ्वी, निसर्ग, अंतरिक्ष, परग्रह याबद्दलच्या तपशीलांची नोंद करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम, वेगवेगळ्या मोहिमा तो राबवू लागला आहे.

त्सुनामी भूकंपामुळे पुन्हा एकदा पृथ्वीबद्दलचे, तिच्या अंतरंगाबद्दलचे आपले कुतूहल चाळवले गेले तर नवल नाही.

निरंजन घाटे यांचे वसुंधरा हे पुस्तक तुमच्या जिज्ञासापूर्तीसाठी अत्यंत

उपयुक्त ठरेल. त्याच्या उपयुक्ततेमुळेच त्याची सुधारित चौथी आवृत्ती नुकतीच बाजारात आली आहे. १९९५ नंतर भूकंप-ज्वालामुखी-सागर-जीवाश्म, सरकती भूखंडे, हिमनद्या वगैरे बाबींविषयी झालेल्या संशोधनाचाही मागोवा या आवृत्तीत समाविष्ट केला गेला आहे.

या पुस्तकाद्वारे पृथ्वीबद्दलच्या माहितीचा खजिनाच जणू सताड खुला होऊन आपल्या प्रज्ञाचक्षूंना आव्हान देत आहे.

* या पृथ्वीचा जन्म कधी झाला? पृथ्वीचे आजचे वय काय?
* या पृथ्वीचा आकार कसा आहे? आकारमान काय?
* या पृथ्वीच्या अंतरंगाची जडणघडण कशी झाली आहे?
* भूकंप का होतात? कशामुळे होतात?
* ज्वालामुखी का होतात? धोकादायक ज्वालामुखी कोणते?
* पृथ्वीवर कोणकोणती युगे होऊन गेली
* भूकंपाचे भाकीत करण्याचे शास्त्र अजून बाल्यावस्थेत आहे असे का म्हणतात?

**किरणोत्सर्जन म्हणजे काय? त्यामुळे कोटी, अब्ज वगैरे कालगणना कशी सोपी होऊ शकते? त्यामुळे पृथ्वीचे अचूक वय काढणे कसे शक्य होते?**

* ज्वालामुखीच्या उद्रेकातून निघालेल्या राखेतले अग्निजन्य काचेचे सूक्ष्म कण आणि सल्फर डाय ऑक्साइडसारखे वायू यावरील संशोधनावरून काय काय अंदाज बांधले गेले आहेत?
* भूगर्भाचे तापमान सौरपृष्ठांवरील तापमानापेक्षा किती जास्त असते? भूपृष्ठ आणि भूगर्भ यांच्यामधील २९०० किलोमीटरचा भाग (मँटल) प्रक्रमण क्रियेमुळे सतत ढवळला जात असतो, त्याचा परिणाम कसा दिसतो?
* चारशे किलोमीटरपेक्षा जास्त खोल भूगर्भाची त्रिमित आरेखने मिळवणे अजून का जमलेले नाही?
* ज्वालामुखीचा अचूक अंदाज वर्तविता येतो का? उद्रेकापूर्वी बराच मॅग्मा (तप्त शिलारस) नव्याने वाहून नेला जातो, त्यावरून उद्रेकाची वेळ सांगणे शक्य होते का?
* किरणोत्सर्जन म्हणजे काय? त्यामुळे कोटी, अब्ज वगैरे कालगणना कशी सोपी होऊ शकते? त्यामुळे पृथ्वीचे अचूक वय काढणे कसे शक्य होते? (पृथ्वीचे वय उल्कांच्या अभ्यासावरून ४५० कोटी वर्षे असे अनुमान निघते
* जीवाश्मांचे अश्मीभवन कसे होते? जीवाश्म्याच्या अभ्यासावरून उत्क्रांतीबद्दल काय माहिती मिळते?



* पुराजीवी महाकल्प, मध्यजीवी महाकल्प, नूतनजीवी महाकल्प, प्लाइस्टोसीन व इतर हिमयुगे असे वर्गीकरण काय दर्शविते?
* पृथ्वीच्या कक्षेला छेदून जाणाऱ्या कक्षा असलेले ८० लघुग्रह आतापर्यंत निदर्शनास आलेले आहेत. प्रत्यक्षात ते त्यापेक्षा दहापट तरी जास्त असावेत असे का म्हणतात?
* पृथ्वीवर सुमारे २१ कोटी वर्षापूर्वी प्रथम डायनोसॉरस अस्तित्वात आले. चौदा कोटी वर्षे या जातीच्या प्राण्यांचाच पृथ्वीवर संचार राहिला. त्यानंतर मात्र ते पृथ्वीवरून नामशेष झाले. भूशास्त्रीय पुराव्यांद्वारे हे सिद्ध होऊ शकते. या पुराव्यांचे स्वरूप काय?
* वातावरण आणि वातावरणशास्त्र यांच्या अभ्यासामुळे अंतरिक्ष प्रवासाला कशा प्रकारे चालना मिळाली?
* वातावरणाचे घटक कोणते? ९० किलोमीटरपेक्षा कमी उंचीवर ऑक्सिजनचे रेणू अदृश्य होतात; आणि ओझोन वायूचा पट्टा (ओझोनांबर) तयार होतो हे कोणी दाखवून दिले?

**पृथ्वीवर सुमारे २१ कोटी वर्षापूर्वी प्रथम डायनोसॉरस अस्तित्वात आले. चौदा कोटी वर्षे या जातीच्या प्राण्यांचाच पृथ्वीवर संचार राहिला. भूशास्त्रीय पुराव्यांद्वारे हे सिद्ध होऊ शकते. या पुराव्यांचे स्वरूप काय?**

* चुंबकांबरास वातावरण म्हणायचे का?
* पृथ्वीवरील मातीच्या आवरणाचे, मृदावरणाचे स्वरूप आणि गुणधर्म काय? मृदांचे महत्त्वाचे प्रकार कोणते?
* हिमनद्यांचे प्रकार कोणते? व्हॅली (दरी) ग्लेसियर, हँगिंग ग्लेसियर, गिरीपद ग्लेसियर, खंडीय हिमवाह, हिमनद्या यांची वैशिष्ट्ये काय?
* नद्यांची निर्मिती कशी होते? नद्यांची चोरी होते हे खरे आहे का?
* भूपृष्ठाखाली असणाऱ्या भूजलाचा अभ्यास कशासाठी उपयुक्त ठरतो?
* उल्कापाताने तयार झालेली सरोवरे कोणती
* सगळ्यात मोठे सरोवर कोणते? (कॅस्पियन समुद्र ४ लाख ४० हजार चौ. किलोमीटर आणि त्याची खोली ११०० मीटर)
* सागरतळाचे प्राणीविश्व आणि पृथ्वीवरील प्राणीविश्व यात काय फरक जाणवतो?
* सागराच्या अंतरंगात काय काय दडलेले आहे? (एका घन किलोमीटरमध्ये साडेपाच अब्ज टन पाणी असते, आणि त्यात २० कोटी टन घन पदार्थ विरघळलेल्या स्वरूपात असतात. सर्व समुद्र मिळून १४००,०००,००० घन

किलोमीटर एवढी पृथ्वीवरील जागा व्यापतात हे तुम्हाला ठाऊक आहे का?)

* समुद्राच्या तळाशी खनिजे, वनस्पती, शंखशिंपले वगैरेंचे भांडार आहे. शंखशिंपल्यातून राहणाऱ्या प्राण्यांच्या चार हजार जाती-उपजाती आढळतात. दक्षिण पॅसिफिक महासागरात १ कोटी चौरस किलोमीटर प्रदेशात ५० अब्ज टन मँगेनीझचे गोळे पसरलेले आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर हिऱ्यांचा प्रचंड साठा आहे. स्कुबा डायव्हिंग द्वारे समुद्राच्या तळाशी खोल खोल जाण्याचे प्रयत्न सुरू आहेत; त्यामुळे पाण्याखाली वसाहतींचेही स्वप्न काही जणांना पडत आहे हे तुम्हाला माहीत आहे का?

* सागरतळ कसे तयार होतात? त्याबद्दल नवे अंदाज पूर्वीच्या गृहीतांना कसे छेद देतात? वर येतो, त्याचे स्फटिकीभवन होऊन सागरतळ तयार होतात असा सिद्धान्त १९८० पर्यंत सर्वमान्य होता. परंतु आता पेरिडोटाइट या पानालिक खडकांचे सागरी पाणी, गाभ्यातून वर येताना कमी झालेले तापमान आणि दाब यामुळे झालेले रूपांतर सागरतळ तयार करते असे मत प्रचलित होत आहे.

* पर्वत कसे तयार होतात?

**हिमनद्यांचे प्रकार कोणते? व्हॅली (दरी) ग्लेसियर, हँगिंग ग्लेसियर, गिरीपद ग्लेसियर, खंडीय हिमवाह, हिमनद्या यांची वैशिष्ट्ये काय?**

* सर्वात मृदू खनिज व सर्वात कठीण खनिज म्हणजे हिरा या दरम्यान टाल्क, जिप्सम, कॅल्साइट, फ्लुओराइट, ॲपटाइट, ऑर्थोक्लेज, क्वार्टझ्, टोपाझ, कोरंडम, हिरा असे टप्पे पडतात. खनिजांची ओळख पटवून घेण्यासाठी चमक, भंगत, विशिष्ट गुरुत्व, चुंबकत्व, वर्णदीप्ती, प्रतिदिप्ती (फ्लुरोसन्स्) या गुणधर्मांचा उपयोग होतो हे तुम्हाला ठाऊक आहे का?

* वनस्पतींच्या अभ्यासावरून खनिजांचे साठे शोधण्यात रशियन शास्त्रज्ञांना यश आले आहे. उरल पर्वतराजीतील काही खेड्यात लोकांना मानेत गाठ येण्याचे प्रमाण मोठे होते. तेथील वनस्पतीमधून व पण्यातून आहारात कोबाल्ट त्यांच्या शरीरात जात होते. त्या खेड्यांच्या जमिनीत कोबाल्टचे साठे आढळून आले. अशी उदाहरणे अन्यत्रही दिसून आली आहेत हे तुम्हाला ठाऊक आहे का?

* पृथ्वीवर मानवाची उत्पत्ती कशी झाली? केव्हा झाली? मानवाचा मूळ पूर्वज कोण?

अशा अनेक बाबींवर प्रकाश टाकणारे लेख वसुंधरा या पुस्तकात आहेत. आपण या पृथ्वीवर राहतो त्या पृथ्वीची ही ओळख आपल्याला हवीच.

**पृष्ठे : २२८ ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : १७५रु. ● पोस्टेज : २५रु.**



# नवेशतक

**निरंजन घाटे**




**विविध क्षेत्रात नवे काहीतरी शोधून काढण्यासाठी चाललेले वैज्ञानिक प्रयत्न**

एकविसाव्या शतकात प्रवेश करताना एकूणच मानव आपल्या प्रगतीवर खूष होता. गेल्या दोनचार हजार वर्षात लागले नाहीत असे महत्त्वाचे शोध विसाव्या शतकात मानवाने लावले आणि स्थलकालावर मात करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम दैनंदिन व्यवहाराच्या पातळीवर आणण्याएवढे तंत्रज्ञान विकसित केले. आश्चर्य म्हणजे दोन महायुद्धांच्या दरम्यान बॉंबफेकी विमाने, शस्त्रसामग्री, पाणबुड्या इ. विविध क्षेत्रातील संशोधनाला जोरदार चालना मिळाली. शीतयुद्धामुळेही अंतरिक्ष प्रवासाला गती मिळाली. संगणकाचा वापरही लष्कराच्या दृष्टीने आधी अपेक्षित होता; इंटरनेट तर लष्कराच्या संदेशवहनासाठीच प्रारंभी वापरण्याची कल्पना होती; पण संगणक-इंटरनेट-मल्टिमिडिया यांनी सर्वच क्षेत्रात क्रांती केली. वैद्यकीय क्षेत्रातही बायोटेक्नालॉजी, जीव अभियांत्रिकीने आपला प्रभाव दाखवून अनेक व्याधींना आटोक्यात आणले.

विसाव्या शतकात संशोधनाची झेप कुठवर जाईल या विषयी अनेक शास्त्रज्ञांनी व्यक्त केलेली मते कधी दूर दृष्टीची तर कधी हास्यास्पद ठरली असे दिसून येते. काही भाकिते तर मजेशीरच होती.

एसी विद्युत मोटारीचा संशोधक निकोला तेस्ला याने ''अवकाशात कार्य करू शकेल असे इंधन सध्या उपलब्ध नाही. शून्याखाली ४५९ अंश थंडीत कुठलंही यंत्र काम करील असे वाटत नाही; असे इंधन मिळेपर्यंत माणूस चंद्रावर जाण्याची शक्यता नाही'' असे भविष्य १९२८ साली वर्तवले होते. मात्र तेस्लाने जेट इंजिनाचा वापर करून विमानं समुद्र पार करतील असे त्यावेळी म्हटले होते. तर १९३० मध्ये अर्ल ऑफ बर्कनहेडने ऊर्जानिर्मितीसाठी अणुशक्तीचा वापर एकविसाव्या शतकात करणे शक्य होईल असे म्हटले होते. चंद्रावर माणसानं कशासाठी जायचं असा प्रश्न त्यांनी विचारला होता. परंतु साठोत्तरी काळात अमेरिकेचे अंतराळवीर प्रत्यक्ष चंद्रावर पोचले आणि पुढे मंगळावरही यान उतरवणे

शक्य झाले हा विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनाच्या जलद प्रगतीचाच द्योतक आहे. अशी भाकिते वर्तविण्यात व नाकारण्यात धोका असतोच. १९२१ मध्ये ‘अवकाशात अग्निबाण संचार करतील’ असे म्हणणाऱ्या गोडार्डला न्यूयॉर्क टाइम्सने मूर्ख ठरवले होते. त्याला क्रिया व प्रतिक्रिया यांचे तत्त्व कळलेले दिसत नाही असे म्हटले होते. ४८ वर्षांनी १९६० मध्ये न्यूयॉर्क टाइम्सने मानवाचे चंद्रावतरण झाल्यावर त्याबद्दल जाहीर माफी मागितली.

त्यामुळे अशा भाकितांबद्दल जपून बोललेलेच बरे!

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात लागलेल्या शोधांची नोंद केली तर अशा भाकितांपेक्षाही अधिक मजल माणसाने मारलेली आहे हे लक्षात येते.

निरंजन घाटे यांनी नवे शतक या पुस्तकातील २९ लेखांद्वारे नव्या संशोधनाची ओळख करून देण्याचा प्रयास केला आहे. सदराच्या रूपात हे लेख प्रसिद्ध झालेले असल्याने त्यात तसे शिस्तबद्ध सूत्र नाही. परंतु काही महत्त्वाच्या घटनांची वाचकांना कल्पना येऊ शकते; आणि आश्चर्यही वाटू शकते.

अशा शोधांची काही उदाहरणे पहा.

**१९२१ मध्ये ‘अवकाशात अग्निबाण संचार करतील’ असे म्हणणाऱ्या गोडार्डला न्यूयॉर्क टाइम्सने मूर्ख ठरवले होते. ४८ वर्षांनी १९६० मध्ये न्यूयॉर्क टाइम्सने मानवाचे चंद्रावतरण झाल्यावर त्याबद्दल जाहीर माफी मागितली.**

□* सूक्ष्म चकतीच्या रूपात प्रत्येक व्यक्तीचा जननिक ठसा उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे त्या व्यक्तीला कुठले आनुवंशिक रोग होण्याची शक्यता आहे याची पूर्वसूचना मिळू शकेल. या चकतीच्या निर्मितीचे प्रयत्न चालू आहेत. व्यक्तीच्या संभाव्य गुणधर्मांची नोंद करण्याचे काम करायला आजच्या तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं किमान दहा वर्षे लागतात. पण या जननिक ओळखपत्राद्वारे ते काम एका दिवसात होईल. (पृष्ठ ३१-३३)

□* १९९३ मध्ये ‘ॲफ्रिमेट्रिक्स’ या कंपनीची स्थापना झाली. डीएनए चिप बनविणारी प्रयोगशाळा तेथे असून डीएनएची तपासणी करण्याची यंत्रणा तेथे आहे. वैयक्तिक तपासणीनंतर डॉक्टर रुग्णाला विशिष्ट औषधे देतात; तशी औषधे देण्यासाठी डीएनए चिपचा वापर करता यावा यावर संशोधन चालले आहे. (३४).

□* ॲफ्रिमेट्रिक्सच्या प्रमाणित चिपपेक्षा स्वस्त मार्ग म्हणजे यंत्रमानव तयार करून त्याद्वारे डीएनए रेणूतील विशिष्ट जिनचा छडा लावणे असे स्टॅनफोर्ड विद्यापाठातील जोसेफ दरिसी यांचे मत आहे. (३६)

□* १९९० ते १९९९ या दशकाला मेंदू संशोधनाचे दशक मानले गेले. मेंदूचे अभ्यासक मेंदूची तपासणी करून मेंदूत हवे ते बदल करता यावेत यासाठी प्रयोग करीत आहेत. मतिमंदांना शिक्षण देणे, उदासीनता दूर करणे, पक्षाघाताने विकलांग



बनलेला व्यक्तींना सक्षम बनवणे, स्मृतिभ्रंशाची सुरुवात लांबवणे वगैरे गोष्टी त्यामुळे आपल्या आवाक्यात येतील (४०).

□* मेंदूमधील अनियंत्रित मंडलांचा छडा लावण्याचे संशोधन डॉ. मॅकक्लेलँड यांनी चालवले आहे.

□* पेशी जीर्ण होतात; त्यांची जीर्णावस्था रोखून धरण्याचा मार्ग टेक्सास साऊथवेस्टर्न मेडिकल सेंटरमधील जेरीशे आणि वुडरिंग राइट यांनी शोधून काढला आहे.

□* पेशी का मरतात याची कारणे १९६१ मध्ये लिओनार्ड हेफ्लिकने शोधून काढली. टेलिमिरेज नावाचे संप्रेरक वापरून टेलोमीअर्सची (गुणसूत्राची टोके) लांबी कमी होणे थांबवता येते. (४६) त्यामुळे काही पेशी कायम तरुण राहतात.

□* टेलोमरेजमुळे कर्करोग होतो हा समज रास्त नसला तरीही टेलोमरेजरोधक रसायन निर्मितीचा प्रयत्न चालू आहे. (४७)

□* वृद्धत्व टाळण्यासाठी काय करावे? दीर्घायुषी कसे व्हावे? शरीरातील पेशी अन्नग्रहण करून त्यापासून ऊर्जा निर्माण करतात. त्यावेळी पेशीमध्ये टाकाऊ पदार्थ (अपशिष्टे) तयार होतात. त्यातील सर्वात घातक पदार्थ म्हणजे ऑक्सिजनयुक्त मुक्त रेणू-फ्री रॅडियल. या मुक्त रेणूमध्ये एक इलेक्ट्रॉन (ऋणभारित) कण जादा असतो; त्यामुळे हा रेणू सापडेल त्या रेणूंना चिकटतो आणि अपायकारक प्रक्रियांना तो गती देतो. त्या मुक्त रेणूला बंदिस्त केले तर वार्धक्य काही प्रमाणात लांबवता येईल (५४).

**१९९० ते १९९९ या दशकाला मेंदू संशोधनाचे दशक मानले गेले. मेंदूचे अभ्यासक मेंदूची तपासणी करून मेंदूत हवे ते बदल करता यावेत यासाठी प्रयोग करीत आहेत.**

□* वृद्धत्व म्हणजे शरीराचं शर्करावगुंठीकरण. ही प्रक्रिया मुक्तरेणू संयोग प्रक्रियेसारखीच आहे. (५५)

□* बहुतेक सर्व प्राण्यांमध्ये जीवनावधी ठरवणारे क्लॉक जीन्स हे सारखेच असून त्यांची कार्यपद्धतीही समान असते. (६०)

□* मानवी स्वभावविशेष आणि मानसिक व्याधी हे दोन्हीही मेंदूतील रसायनावर अवलंबून असतात. लाजाळू मुलांमध्ये मेंदूचा आमिग्डाला नावाचा बदामाच्या आकाराचा भाग अधिक संवेदनशील असल्याचे आढळून येते.

□* क्षणिक भावनांमुळे होणाऱ्या कृत्यांना नॉरएपिनेफ्राइन हे शारीरिक रसायन जबाबदार असते. (६९)

□* ॲंटि डिप्रेसन्ट म्हणजे उदासीनता दूर करणारे प्रोझॅक, बुजरेपणा दूर करणारे नॉर्डिल आणि मन एकाग्र करण्यासाठी रिटॅलीन ही उपयुक्त औषधे मेंदू संशोधनातून मिळालेली वरदाने होत. (७२)

□* सर्पगंधा या वनस्पतीपासून रिसर्चीन हे औषध बनवले जाते, ते उच्च रक्तदाबाच्या

रुग्णांना उपयुक्त ठरते. (७४)

☐* पृथ्वीवर पावणेतीन लक्ष जातीच्या सपुष्प वनस्पती आढळतात. त्यातील एक टक्का वनस्पतींचीही रासायनिक घटकांसाठी तपासणी झालेली नाही. १९९५ पासून वनस्पतींच्या संशोधनाला अधिक महत्त्व दिले जात आहे (७७)

☐* लेझर किरणांद्वारे १९७० नंतर सूक्ष्म शस्त्रक्रिया करण्याबाबत नवनवी उपकरणे बाजारात येत राहिली आहेत. पेशी पातळीवरही त्यामुळे बदल घडवून आणता येतो. (८४)

☐* लेझर कात्रीमुळे निपुत्रिकांना पुत्रप्राप्ती होऊ शकते. बीजांडाच्या आवरणास लेझर कात्रीने छेद घेऊन शुक्रजंतूंचा मार्ग मोकळा करता येतो. (८५)

☐* लेझर शलाका वापरून मोतीबिंदू नष्ट करता येतो, मूतखडे फोडता येतात, पेशी अंतर्गत हालचालींचा अभ्यास करता येतो (८७)

☐* मानवी अपंगत्वावर मात करण्यासाठी विद्युत यांत्रिकी उपकरणे आणि कृत्रिम स्नायू यांचा वापर वाढत आहे. कार्बनी धाग्यांच्या हाडांसारख्या नळ्यांमध्ये छोट्या छोट्या विद्युत यंत्रणा इलेक्ट्रिक मोटारी बसवण्यात येतात; या मोटारी गीअरच्या सहाय्याने यांत्रिक उर्जेचं हालचालीत रूपांतर करतात. (९१)

☐* जीव इलेक्ट्रॉनिक यंत्रणांद्वारे दृष्टी आणि श्रवणशक्ती यांची क्षमता वाढवता येते.

☐* प्राण्यांचे क्लोनिंग (फुटवे) तयार करण्याची पद्धती यशस्वी ठरल्यावर त्या फुटव्यांमध्ये मानवी संप्रेरके निर्माण करणारे मानवी डीएनए रेणू घुसवून त्यापासून हवी ती पोषक द्रव्ये असणारे दूध देणाऱ्या गायी निर्माण करता येतील असा विचार पुढे आला आहे. त्यासाठी जीव इन्सर्शन आणि क्लोनिंग या दोन तंत्रांचा वापर करता येतो. (९७).

☐* फायब्रिनोजेन हा रक्तातला प्रथिनघटक असून त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या बनतात आणि जखमेतून होणारा रक्तस्राव थांबतो. फायब्रिनोजेन युक्त बँडेज, मलम किंवा फेस करणारा फवारा यांचा वापर रक्तस्राव थांबवण्यासाठी उपयुक्त होऊ शकेल. (९८).

☐* सागरातून अग्निबाण सोडण्याचे प्रात्यक्षिक प्रथम १९४९ साली झाले. सी लाँच कॉर्पोरेशन (स्थापना-१९९५) उपग्रह प्रक्षेपणासाठी रशियन बनावटीचा झेनिथ अग्निबाण वापरते. मात्र अमेरिकन सरकारच्या लहरीवर तिचा कारभार चालतो (१०५)

☐* इ. स. २०१४ मध्ये मंगळ मोहीम निघावी म्हणून कॅलिफोर्नियातील पॅसाडेना येथील जेट प्रॉपल्शन लॅबोरेटरीमध्ये तयारी चालू आहे (१०७) नासातर्फेही मार्स रेफरन्स मिशनचा तोच प्रयत्न सुरू आहे.

असे खूप काही चालू आहे. आपण भारतीय मंडळी या नव्या ज्ञानाच्या संशोधनात आणि वापरात कुठे आहोत असा प्रश्न पडतो. तो अंतर्मुख करणारा ठरेल तर उत्तम!

**पृष्ठे : २०८ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : १०५रु. ● पोस्टेज : २५रु.**



# ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स

**केन फोलेट**

**अनु. ज्योत्स्ना लेले**




**इराणच्या तुरुंगातून दोन अमेरिकन अधिकाऱ्यांची सुटका करण्याचा अफलातून बनाव?**

केन फोलेट या अमेरिकन लेखकाच्या 'ऑन दि विंग्ज ऑफ ईगल्स' या कादंबरीतील संपूर्ण कथानक हे प्रत्यक्षात घडलेले आहे; आणि ते अत्यंत नाट्यपूर्ण आहे.

या सत्यकथेच्या केंद्रस्थानी जी घटना आहे ती अत्यंत सरधोपट आहे. इलेक्ट्रॉनिक डाटा सिस्टिम कॉर्पोरेशन या अमेरिकन कंपनीने इराणमध्ये शासकीय अर्थव्यवहाराचे नियंत्रण करणाऱ्या संगणकीय कामाचे कॉंट्रॅक्ट घेतलेले असते. परंतु इराणमधील अंतर्गत बंडाळीमुळे आणि आर्थिक मंदीमुळे तेथील शहाचे स्थान डळमळीत होते, आणि या कंपनीला आपले १३० कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांना अमेरिकेला परत पाठवणे क्रमप्राप्त ठरते. (१९७८) परंतु कंपनीच्या दोन कर्मचाऱ्यांना मात्र इराण सरकार तुरुंगात डांबते आणि त्यांच्यासाठी १ कोटी ३० लाख अमेरिकन डॉलर्स एवढी रक्कम जामीन म्हणून भरण्याची आज्ञा, चौकशी यंत्रणेचा प्रमुख अधिकारी ददगर हा करतो. अशी प्रचंड रक्कम भरणे ही आंतरराष्ट्रीय व्यवहारातही गुंतागुंतीची बाब असते आणि अमेरिकेच्या धोरणानुसार बेकायदेशीरही असते. या दोघा अधिकाऱ्यांची सुटका करण्याबाबतचे सर्व प्रयत्न फोल ठरतात. तेव्हा या कंपनीचा मालक रॉस पेरो हा आपल्या या दोन अधिकाऱ्यांची सुटका करून घेण्याचे वेगवेगळे मार्ग शोधू पाहतो. अमेरिकन राजदूत, अध्यक्ष यांच्या पातळीवरचे प्रयत्नही कुचकामी ठरतात. इराणमध्ये अयातुल्ला खोमेनीच्या प्रेरणेने अंतर्गत निदर्शने आणि घातपात यांना ऊत येतो. इराणचा शहा त्यामुळे निष्प्रभ होतो आणि इराणबाहेर पळ काढतो. अयातुल्ला खोमेनी हा कट्टर मूलतत्त्ववादी. इराणमधील अमेरिकनांचा कडवा शत्रू. त्याच्या प्रभावामुळे कोणत्याही प्रकारची चौकशी न करता बिल गेलार्ड आणि पॉल चिप्परोन या दोघांना तुरुंगात पाठवले जाते म्हणून मानवाधिकार समितीही रदबदली

करते. पण राजकीय पातळीवर काहीच निष्पन्न होत नाही तेव्हा रॉस पेरो हा सुटकेचे अन्य मार्ग पत्करण्याचे ठरावतो.

बुल सायमन, जय कोबान, रॉन डेव्हिस, राल्फ बोलवेअर शॉटगन, ड्रायव्हर जो पोचे, ग्लोन जॅकसन, स्फोटक तज्ज्ञ जिम स्क्वेबाज, पॅटस्कली यांना एकत्र आणून तुरुंग फोडून पॉल व बिल यांना इराणमधून बाहेर काढण्याचा कट तो आखतो... तुरुंगाचा नकाशा वगैरे मिळवतो. त्याचा दरवाजा बॉंबस्फोटाने उडवण्याचा प्लॅन तयार करतो. परंतु दरम्यानच्या काळात या दोघा कैद्यांची रवानगी दुसऱ्या तुरुंगात होते. त्यामुळे तो प्लॅन कुचकामी ठरतो नव्या तुरुंगातून त्यांना सोडवण्यासाठी वेगळीच व्यूहरचना क्रमप्राप्त ठरते. त्याच वेळी इराणमधील दंगलींचे प्रमाण वाढते. त्या दंगलींचा फायदा घेऊन रशीद हा शिकाऊ इंजिनियर तुरुंगातील कैद्यांमध्ये दंगल घडवून आणून, तुरुंगाच्या पहारेकऱ्यांना पळूवन लावून कैद्यांनीही बाहेर पडायचे अशी कल्पना प्रत्यक्षात आणतो.

तुरुंगातून बाहेर पडलेल्या पॉल आणि बिल यांना तेहरान शहरातून बाहेर काढणे, इराणमधून बाहेर काढणे हाही एक अत्यंत जोखमीचा भाग असतो. कारण तुरुंगातून ते दोघे पळालेले आहेत म्हटल्यावर विमानतळावर आणि शहरी सीमेवर सर्वत्र त्यांच्या शोधात पोलिस यंत्रणा डोळ्यात तेल घालून सज्ज असते.

**या सत्यकथेत प्रत्येक तपशील हा वास्तव पातळीवरून ठरवला जातो आणि साकार होतो. इथे मनात आलेले सारेच काही चुटकीसरशी होत नाही. त्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. अनेक लोकांना वश करावे लागते.**

हे अर्थात जमून येते; परंतु अनेक अडथळ्यांची शर्यत पार केल्यावर, जीवावर बेतलेल्या प्रसंगातून बचाव झाल्यावर.

एरव्हीच्या थरारकथांमधील गुप्तहेर वा नायक आपल्या प्रतिस्पर्ध्यांशी मुकाबला करताना तऱ्हेतऱ्हेचे उपाय वापरतात. जेम्स बॉंडसारखे हेर छुपे कॅमेरे, छुपी शस्त्रे वापरतात. मानवी सामर्थ्यापेक्षाही अधिक काहीतरी करीत असतात. या सत्यकथेत प्रत्येक तपशील हा वास्तव पातळीवरून ठरवला जातो आणि साकार होतो. इथे मनात आलेले सारेच काही चुटकीसरशी होत नाही. त्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. अनेक लोकांना वश करावे लागते. वस्तुस्थितीचा उलटसुलट शहानिशा करूनच पुढचे पाऊल ठरवावे लागते.

या कथेतील सर्वात अंगावर शहारे आणणारा आणि अस्वस्थ करणारा भाग म्हणजे पॉल आणि बिल यांच्या चौकशीचा फार्स. तुमची मामुली चौकशी करून तुम्हाला अमेरिकेला परत जाऊ दिले जाईल अशी खात्री देत या चौकशीसाठी जाण्यास त्यांना प्रवृत्त करण्यात येते. परंतु चौकशी करणारा लठ्ठ, खुजा, पन्नाशीचा न्यायाधीश ददगर हा जेव्हा त्यांना सांगतो की, ''तुमची उत्तरे समाधानकारक



वाटली नाहीत तर तुम्हाला तुरुंगात टाकण्याचे अधिकार मला आहेत... तुम्हाला जर याची जाणीव नसेल तर तुम्ही इंटरव्ह्यू पुढे ढकलू शकता. त्यामुळे तुमच्या वकिलातीला जामीनाची व्यवस्था करण्यासाठी अवधी मिळेल.'' आपण काही गुन्हा केलेला नाही, आपण कोणाचा खून केलेला नाही, कायदा मोडलेला नाही, म्हणून ही धमकी अनौपचारिक आणि आपल्याला फक्त घाबरवण्यासाठी आहे असे पॉल, बिल यांना वाटते. तेव्हा हा फार्स एकदाचा संपवून टाकू असा विचार ते करतात, ते सांगतात, ''आम्ही कोणताही गुन्हा केलेला नाही. दुसऱ्याने केलेल्या गुन्ह्याची आम्हांला माहिती नाही. आमच्याविरुद्ध कोणतेच आरोप असणे शक्य नाही, हे आम्ही पटवून देऊ. नववर्षासाठी आम्हाला घरी जाता यावे म्हणून हा इंटरव्ह्यू आताच घेणे इष्ट ठरेल.''

ददगर आधी पॉलशी एकट्याशीच बोलतो. उलटतपासणीसारखे त्याचे प्रश्न असतात. ददगरच्या प्रश्नांचा रोख त्याच्या लक्षात यायला वेळ लागतो. ददगर कसली तरी खेळी खेळतोय हे त्याच्या लक्षात येते. काहीही करून त्यांना अडकवायचे असते हे स्पष्ट होते. प्रत्येक प्रश्न व उत्तर यावर त्यांच्या सह्या घेतल्या जातात आणि ददगर सांगतो, ''तुम्हाला अटक करण्यात येत आहे. ९ कोटी तुमान- १३० लाख डॉलर्स ही तुमच्या जामीनाची रक्कम ठरवली आहे.'' बिलला हा आकडा म्हणजे थट्टा वाटते. खुनासारख्या गुन्ह्यातही जामीनाची रक्कम २० हजार असते; आणि येथे १३० लाख डॉलर्स? त्यांना आश्चर्य वाटते. तुरुंगात जाण्याआधी फक्त एकाच फोनची परवानगी देण्यात येते. ते आपल्या एका अधिकाऱ्याला फोन करून काय घडले ते सांगतात. डग्लसच्या मुख्य कार्यालयाला हा प्रकार कळवण्यात येतो. अमेरिकन वकिलातीतूनही संपर्क साधला जातो.

**''तुम्हाला अटक करण्यात येत आहे. ९ कोटी तुमान- १३० लाख डॉलर्स ही तुमच्या जामीनाची रक्कम ठरवली आहे.'' खुनासारख्या गुन्ह्यातही जामीनाची रक्कम २० हजार असते; आणि येथे १३० लाख डॉलर्स?**

... २८ डिसेंबर १९७८ रोजी इलेक्ट्रॉनिक्स डाटा सिस्टिमच्या अध्यक्षाला, रॉस पेरोला सकाळी ही बातमी कळते आणि पुढची चक्रे चालू होतात. पॉल आणि बिल हे दोघेही त्या कंपनीचे आरंभापासूनचे विश्वासू अधिकारी होते. त्यांनी आपले आयुष्य कंपनीसाठी दिले होते. छोट्या कंपनीचे आज मोठ्या कॉर्पोरेशनमध्ये रूपांतर झाले होते. त्यामुळे या दोघांना एक क्षणही तुरुंगात काढावा लागू नये अशी रॉस पेरोची इच्छा होती.

वैध, कायदेशीर सरळ मार्गाने किंवा राजनैतिक पातळीवरून पॉल-बिलची सुटका होऊ शकत नाही हे लक्षात आल्यावर रॉस पेरो स्वत: इराणमध्ये येऊन

दाखल होतो. सुटकेची योजना आखून संबंधित व्यक्तींना तेहरानमध्ये येण्यास सांगतो...

तुरुंगातून पळ काढण्यात यश आल्यावर पॉल-बिलला बिनबोभाट इराणबाहेर काढण्यासाठी खूपच कसरत करावी लागते... बोईंग ७०७ विमानही त्यासाठी मिळवण्यात येते.

रॉस पेरो आपल्या दोन अधिकाऱ्यांच्या सुटकेसाठी जे करतो, त्याचे अर्थातच अप्रूप वाटते. परंतु इराणसारख्या देशात कायद्याच्या नावावर जे काही घडू शकते, ते बघून मती सुन्न होते.

नेहमीच्या थ्रिलरमधला मालमसाला या कादंबरीत फारसा नाही; तरीही ती वाचकाला खिळवून ठेवते. मानवी भावभावनांचा हृदयस्पर्शी आलेख काढते.

या घटनेनंतर संबंधितांच्या जीवनात पुढे काय झाले याचीही कल्पना समारोपात देण्यात आली आहे. पॉल व बिल दोघे कंपनीतच राहिले. पॉल कॉम्प्ट्रोलर झाला; बिल कंपनीच्या हेल्थकेअर डिव्हिजनचा डायरेक्टर झाला. रॉस पेरो याच्या ऑईल कंपनीची चांगलीच भरभराट झाली.

**पृष्ठे : ३५६ ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : १७५रु. ● पोस्टेज : २५रु.**


www.mehtapublishinghouse.com

**केवळ सहा महिन्यातच १५००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!** कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, फ्रान्स, जपान,ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान,युनायटेड अरब अमिराती, जर्मनी इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्ट्ये**

- संपूर्णपणे मराठी असलेली वेबसाईट
- लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार,पुस्तकाच्या नावानुसार पुस्तके 'सर्च' करण्याची सुलभ सुविधा
- पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय
- प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परिक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती
- आपल्या आवडीनुसार नवीन पुस्तकांची माहिती इमेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा
- आपल्या पसंतीच्या लेखकांबद्दलची माहिती
- आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती
- क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा


आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.




# इंदिरा

इंदिरा नेहरू गांधी यांचे चरित्र

**कॅथरीन फ्रँक**
**अनु. लीला सोहोनी**




## गूंगी गुडिया ते सर्वंकष सत्ताधीश

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नाट्यपूर्ण जीवनसंघर्षाचे आवाहन देशातील जनसामान्यांना हुलकावण्या दाखवत राहिलेले आहे, आणि त्यांच्या निधनाला वीस वर्षे झाली तरी हे कुतूहल अजूनही कायम राहिलेले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे गूढ उकलण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासक करीत आहेत; त्यामुळे त्यांच्याविषयीच्या पुस्तकांमध्येही सतत भर पडत राहिलेली आहे.

कॅथरिन फ्रँक या अमेरिकन लेखिकेने एमिली ब्रान्टे, मेरी किंग्सले प्रभृतींची चरित्रे लिहून एक चरित्रकार म्हणून स्वत:चे वेगळेपण प्रस्थापित केले आहे. इंदिराजींच्या जीवनाचेही तिला आकर्षण वाटले; त्यासाठी भारतात अनेकवेळा येऊन, इंदिराजींच्या निकटवर्तीयांच्या भेटीगाठी घेऊन, इंदिराजींचा पत्रव्यवहार वगैरे अभ्यासून, सहा वर्षे परिश्रम घेऊन तिने सहाशे पृष्ठांचे 'इंदिरा' हे चरित्र इ. स. २००१ मध्ये प्रसिद्ध केले. त्या चरित्राचे अमेरिका-इंग्लंडमध्ये चांगले स्वागत झाले, भारतातही त्याने बेस्टसेलरच्या यादीत स्थान पटकावले. त्याचाच मराठी अवतार लीना सोहोनी यांच्या शब्दांतून आता मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे उपलब्ध होत आहे.

इंदिराजींच्या बालपणापासून ते निधनापर्यंतचा एक प्रवाही घटनापट या चरित्रातून डोळ्यापुढे उभा राहतो, आणि इंदिराजींच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू सहजपणे लक्षात येतात.

कॅथरीन फ्रँक आपली वस्तुनिष्ठ दृष्टी कुठेही सोडत नाहीत. तरीही इंदिराजींच्या व्यक्तिमत्त्वाशी त्या समरस झाल्या आहेत, आणि लहानपणापासूनच्या वेगवेगळ्या घटनांद्वारे इंदिराजींच्या अंतरंगाचे समर्थपणे दर्शन घडवण्याबाबत त्यांनी दाखवलेले

कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. पंडित नेहरूंचे आणि इंदिराजींचे राजकीय आयुष्य वृत्तपत्रीय बातम्यांद्वारे (आणि पुढे दूरदर्शनद्वारे) आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहे. परंतु त्यांच्या जीवनातील अनेक घटना या आपल्याला अपरिचित होत्या, हे अशी अभ्यासपूर्ण चरित्रे वाचताना आपल्याला जाणवते. नेहरू कुटुंबातील ताणतणावांचे ज्ञान होते आणि आश्चर्य वाटते.

जवाहरलालजींची कमलाशी १९१६ मध्ये विवाह झाला; त्याआधी वर्षभर नेहरू घराण्यातील मुलींसाठी नेमलेल्या गव्हर्नेस हूपरच्या देखरेखीखाली सनातनी रूढीप्रिय घराण्यातील कमलाला इंग्रजीभाषा, शिष्टाचार, टेबलमॅनर्स वगैरेंचे शिक्षण देण्यात आले; तरीही नेहरूंची बहीण विजयालक्ष्मी कमलला गावंढळच समजून तिला हिडीसफिडीस करी. छोट्या इंदिराला हे सर्व जाणवत असे; त्यामुळे आपल्या या आत्येबद्दलची नाराजी जन्मभर तिच्या मनात राहिली.

कॅथरीन फ्रँकने कमला-जवाहरलाल व इंदिरा या तिघांचे युरोपमधील वास्तव्य, कमलाचे आजारपण व शुश्रुषा, सॅनिटोरियममधील वातावरण, डॉक्टरांचे निदान-उपचार वगैरे तपशील परिश्रमपूर्वक मिळवून दिले आहेत. कमलाजींना क्षय झाला होता. त्याकाळी म्हणजे १९२६ मध्ये स्पालिंगर व्हॅक्सिनचा मोठा डोस त्यांना देण्यात आला. त्याला त्यावेळी दोनशे पौंड खर्च आला. खर्चिक उपचार चालू असले तरी दुसऱ्या बाजूला त्या कडाक्याच्या थंडीत घालायला पुरेसे कपडे नव्हते, खायला अन्न नव्हते. हलक्यासलक्या लॉजमध्ये रहावे लागत होते. मात्र जिनीव्हातील उत्तम शाळेत इंदिराला घातलेले होते. त्या शाळेमुळे इंदिराचा जणू कायापालट झाला. इतर खर्चाबाबत घरात काटकसरीचे धोरण असले तरी इंदिरासाठी अत्याधुनिक कपडे घेतले जात. रोमा रोलाँ, अर्न्स्ट टोलर या साहित्यकारांकडे नेहरूंचे जाणे-येणे असे. इंदिरालाही ते बरोबर नेत. त्यावेळची इंदिराची पत्रेही पुस्तकात दिलेली आहेत.

**कमलाला इंग्रजीभाषा, शिष्टाचार, टेबलमॅनर्स वगैरेंचे शिक्षण देण्यात आले; तरीही नेहरूंची बहीण विजयालक्ष्मी कमलला गावंढळच समजून तिला हिडीसफिडीस करी. त्यामुळे आपल्या या आत्येबद्दलची नाराजी जन्मभर तिच्या मनात राहिली.**

''प्रिय पप्पू आणि मम्मी,

तुमच्या पत्राबद्दल धन्यवाद. माझ्या नव्या टूथब्रशचा नंबर काय, असं मम्मीला विचारा. आम्ही काल खूप मजा केली...तुम्ही कसे आहात?

तुमची लाडकी इंदू.

इंदिरेने आपल्या या शाळेच्या आठवणी लिहिलेल्या आहेत. (त्यात कुठेही शाळेतील अभ्यासक्रमाचा उल्लेख दिसत नाही. असा उल्लेख कॅथरीन फ्रँकने



केला आहे. पृष्ठ ४७).

त्याचवेळी जॉर्ज बर्नार्ड शॉचे सेंट जोन हे नाटक इंदिरेने बघितले. त्या नाटकाचा तिच्यावर फार परिणाम झाला. पंतप्रधान झाल्यावर इंदिराजींनी म्हटले होते, ''जोन आर्कचा माझ्या मनावर प्रभाव होता. याचं मुख्य कारण म्हणजे ती ब्रिटिशांशी लढली. शिवाय तीही माझ्यासारखीच एक मुलगी होती... जोन ऑफ आर्कच्या बलिदानाच्या समर्पणाच्या वृत्तीनं मला भारून टाकलं होतं. तिनं जसं मरण पत्करलं, तसंच मरण आपल्या वाट्याला यावं असं मला वाटून गेलं.'' हे उद्गार देऊन इंदिराजींनी बालपणाच्या अनेक घटनांना दंतकथांचं रूप दिलं असावं अशी भावना कॅथरीन फ्रँकने व्यक्त केली आहे. कारण? प्रत्यक्षात इंदिराजी सत्तेवर येण्यापूर्वी त्यांच्या पत्रात वा भाषणात जोन ऑफ आर्कचा उल्लेख आढळत नाही. उलट, लहानपणी मला जोन ऑफ आर्कचे काही महत्त्व वाटत असल्याचे आठवत नाही असे त्यांनी एका पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते. (५०) कॅथरीन फ्रँकच्या एकूण संशोधनाचा आवाका लक्षात यावा म्हणून हे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. नेहरूंनी १९३० मध्ये ग्लिम्पेस ऑफ वर्ल्ड हिस्टरीच्या सुरुवातीच्या प्रकरणात जोन ऑफ आर्कची आठवण इंदिरेला सांगितली आहे (७३). २१ मे १९२७ रोजी चार्ल्स लिंडबर्गने सलग ३३॥ तास विमान प्रवास करून अटलांटिक पार करून परतल्यावर पॅरिस विमानतळावर त्याचे स्वागत करण्यात आले. त्यात इंदिराजीही जवाहरलालजीं बरोबर सामील झाल्या होत्या. (५०)

**नेहरूही पद्मजा नायडू यांच्या प्रेमात पडले होते. ते कळल्यावर इंदिराजी अस्वस्थ झाल्या. 'इंदूला अनेक दुःखे झेलावी लागली आहेत. आता तिच्यावर आणखी आघात नको' म्हणून नेहरूंनी पद्मजेशी लग्न केले नाही.**

कमलाजींना पुढे ब्रायटन, लंडन वगैरे ठिकाणी ठेवण्यात आले. पावणेदोन वर्षांनी सर्वजण भारतात परतले. (१९२७)

१९३० साली वानरसेनेची प्रमुख सूत्रधार म्हणून इंदिराजींचे फोटो वृत्तपत्रात झळकले. त्याच सुमाराला अठरा वर्षे वयाच्या फिरोज गांधी या तरुणाची त्यांची प्रथम ओळख झाली. निदर्शने करताना कमला नेहरू यांना उन्हाने चक्कर आली. फिरोजने त्यांना घरी आनंदभवनात आणून पोचवले. कमला नेहरू यांचा तो अनुयायी बनला. ६ फेब्रुवारी १९३१ रोजी मोतीलाल नेहरू यांचे निधन झाले. इंदिराजींना पुण्याला शिक्षणासाठी पाठवण्यात आले. वकील दांपत्याच्या या खाजगी शाळेत शांतिनिकेतनच्या धर्तीवर शिक्षण दिले जाई. पुढे शांतिनिकेतनमध्येच इंदिराने प्रवेश घेतला. (१९३४). तेथे मणिपुरी नृत्य हा तिचा आवडता विषय होता. कमला नेहरू यांची तब्येत बिघडल्याने

पुन्हा युरोप दौरा. (१९३५). कमला नेहरूंचे निधन (२८ फेब्रुवारी १९३६). लुसान स्मशानभूमीत अंत्यसंस्कार. या काळात फिरोज गांधी इंदिराजींजवळ होते. आईच्या आजारपणात अखेरच्या दिवसात त्याचा विश्वासाचा आधार मिळाल्याने इंदिराजी फिरोज गांधींच्या प्रेमात पडल्या. जवाहरलालजी पत्नीच्या अस्थी घेऊन भारतात परतले तरी इंदिराजी शिक्षणासाठी बेक्समध्ये राहिल्या. शाळेच्या सहलीच्या निमित्ताने रोम, फ्लॅरेन्स, नेपल्स, पॉम्पी व सिसिली यांची तीन आठवड्यांची भ्रमंती झाली. १९व्या वाढदिवसानिमित्त नेहरूंनी इंदिराजींना 'मेघदूत'ची सुंदर प्रत पाठवली. त्यावेळी फिरोज गांधी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये शिकत होते. अधूनमधून भेटी होत्या. ३१ मार्च १९३७ रोजी इंदिराजी भारतात परतल्या. त्यावेळी नेहरूंची प्रकृती बिघडल्याने विश्रांतीसाठी ते इंदिराजींबरोबर ब्रह्मदेश, मलेशिया, सिंगापूर दौऱ्यावर गेले. यावेळी इंदिराजींनी फिरोजबाबत मौन बाळगले. त्यावेळी नेहरूही पद्मजा नायडू यांच्या प्रेमात पडले होते. ते कळल्यावर इंदिराजी अस्वस्थ झाल्या. आता वडिलांचे प्रेम विभागले जाणार या विचाराने इंदिराजी दुखावल्या व दुरावल्याही! 'इंदूला अनेक दु:खे झेलावी लागली आहेत. आता तिच्यावर आणखी आघात नको' म्हणून नेहरूंनी पद्मजेशी लग्न केले नाही; परंतु त्यांचे प्रेमप्रकरण पुढेही चालू राहिले (१४१). (पुढे नेहरूंनी पद्मजेला लिहिलेली पत्रे सर्वपल्ली गोपाल यांनी छापून प्रसिद्ध केली तेव्हा इंदिराजी भयंकर संतापल्या होत्या.) इंदिराजींनी फिरोजबाबत मात्र त्यांना काही सांगितले नाही. पुन्हा इंदिराजी परदेशी शिक्षणासाठी परतल्या. फिरोजला भेटल्या 'आयुष्यभर एकमेकांची साथ देण्याच्या आणाभाका झाल्या,' नंतर त्या सोमरव्हिल कॉलेजात दाखल झाल्या. तेथेच वसतिगृहात राहण्याची व्यवस्था झाली. अंगी आत्मविश्वास आला. मनापासून अभ्यास सुरू झाला. राजकीय हालचालींमधेही रस वाटू लागला. नव्या मैत्रिणी मिळाल्या. इंदिराजी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याने ऑक्सफर्ड प्रवेश लांबला. त्यावेळी नेहरूंनी लंडनचा दौरा केला. इंदिराजीही त्यांच्याबरोबर युरोपात भटकल्या. नोव्हेंबर १९३८ मध्ये त्या वडिलांबरोबर २१ व्या वाढदिवसासाठी भारतात परतल्या. (१५६). अल्मोरा येथे काही काळ काढला. फिरोजच्या ताटातुटीने त्या उदास होत्या. १९३९ मध्ये पुन्हा इंदिराजी लंडनला परतल्या. कृष्ण मेनन यांच्याशी त्यांचा परिचय झाला. त्यावेळी इंदिराजींची तब्येत बिघडली. डाव्या फुफ्फुसात दोष असल्याचे आढळले.

> **लंडनमध्ये काही दिवस फिरोज गांधीच्या सहवासात काढले.त्या दोघांच्या प्रेमालाही उधाण आले होते. लग्न करून भारतात परतावे ही इंदिराजींची सूचना फिरोज गांधींनी मानली नाही.**



क्षयरोगाची शक्यता दिसल्याने सारे हबकले.

इंदिराजी विश्रांतीसाठी स्वित्झर्लंडला गेल्या. फिरोजही बरोबर होते. एका पत्रात तेथील फोटो पाठवले. यापूर्वी फिरोजचा उल्लेख त्यांनी कधी पत्रात केला नव्हता. लेसिन सॅनिटोरियममध्ये राहून काही महिने उपचार घेतले. क्षयरोगासाठी तेथे होलिओथेरपीचा वापर डॉ. रोलियर हे करीत असत. इंदिराजींच्यासमोर क्षयरोग हा शब्द कधीही त्यांनी उच्चारला नाही. या सॅनिटोरियममधील वातावरणाबद्दल या पुस्तकात बरेच तपशील आलेले आहेत. (१६६-१८२). नोव्हेंबर १९४० मध्ये इंदिराजींनी स्वित्झर्लंड सोडले. लंडनमध्ये काही दिवस फिरोज गांधीच्या सहवासात काढले. लंडनवर त्यावेळी बॉंबवर्षाव चालू होते; पण त्या दोघांच्या प्रेमालाही उधाण आले होते. लग्न करून भारतात परतावे ही इंदिराजींची सूचना फिरोज गांधींनी मानली नाही. ते दोघे बोटीने भारतात एप्रिल १९४१ मध्ये आले. नेहरू त्यावेळी तुरुंगात होते. फिरोजशी लग्नाचा विचार बोलून दाखवल्यावर नेहरू अस्वस्थ झाले. तेव्हा इंदिराजींनी नेहरूंना पत्र लिहिले.

''एका थोर व्यक्तीची कन्या म्हणून आजवर मी दडपणाखाली जगत आले. पण आता हे दडपण कमी होत आहे. तुमच्या आंतरिक सौंदर्याची आणि समृद्धीची प्रचीती येत आहे. आधी तुमच्यापाशी येऊन मन मोकळं करायची भीती वाटे. तुम्ही सदैव कामात, आणि वरच्या पातळीवर म्हणून न्यूनगंड वाटे. पण आता हे दडपण जाणवत नाही.''

> **एका थोर व्यक्तीची कन्या म्हणून आजवर मी दडपणाखाली जगत आले. तुम्ही सदैव कामात, आणि वरच्या पातळीवर म्हणून न्यूनगंड वाटे. पण आता हे दडपण जाणवत नाही.''**

या पत्राने बापलेकीमधले संबंध सुधारले. नेहरूंनी विवाहाबद्दल इंदिराजींना लिहिले, ''मी तुझ्या निर्णयाच्या आड येणार नाही. तुझा निर्णय हा तुझा स्वत:चाच राहील.'' (पृष्ठ १९५). मात्र हेही बजावले, ''शक्यतो जुने नातेसंबंध तोडून टाकू नकोस. रीतिरिवाज मोडू नकोस. नवी नाती कशी असतील याची तुला अजून कल्पना नाही.''

महात्मा गांधींनी या विवाहाला संमती दिली. तसा लेख हरिजनमध्ये लिहिला. त्यांनी सुचवले की लग्नानंतर पतिपत्नींनी ब्रह्मचर्य पाळावे. त्याला इंदिराजींनी कडाडून विरोध केला. ''एखाद्याला लग्नच करू नका असे सांगणे ठीक. पण लग्नानंतर ब्रह्मचर्य पाळण्याचा सल्ला देणे निरर्थक आहे. त्यातून केवळ मनस्ताप

व कटुताच निर्माण होईल.'' (१९८). नेहरूंनी विवाहाला मान्यता दिली. इंदिराजी-फिरोज वाङनिश्चयाची बातमी वृत्तपत्रात आल्यावर एकच खळबळ उडाली. नेहरूंनी त्यावर आपले निवेदन दिले. ''हा विवाह त्यांच्या आयुष्यातील तसेच आम्ही जपत असलेल्या उदात्त विचारांच्या वाटचालीतील सहजीवनाचे प्रतीक ठरेल. हा विवाह येत्या महिन्यात अलाहाबादला संपन्न होईल.'' २६ मार्च १९४२ रोजी नेहरूंनी कन्यादान केले. हनीमूनसाठी नवदांपत्य नंतर काश्मीरमध्ये गेले (२०६). ऑगस्टमध्ये इंदिराजींना अटक झाली. फिरोज गांधीनाही वर्षाची शिक्षा झाली. १३ मे १९४३ रोजी म्हणजे आठ महिन्यांनी इंदिराजींची सुटका झाली. जुलैमध्ये फिरोजची सुटका झाली. २० ऑगस्ट १९४४ रोजी राजीवचा जन्म झाला. नेहरूंची सुटका जुलै १९४५ मध्ये झाली. सिमला येथे राष्ट्रीय नेत्यांची पहिली परिषद भरली. १९४६ मध्ये सप्टेंबर महिन्यात हंगामी सरकारचा शपथविधी झाला. नेहरू हे एक्झिक्युटिव्ह कौंसिलचे व्हाइस प्रेसिडेंट झाले. पंतप्रधानांचे सर्व अधिकार असणारे हे पद होते. शपथविधीच्या वेळी इंदिराजींना हजर राहता आले नाही. नोव्हेंबरमध्ये नेहरूंनी फिरोज गांधीना नॅशनल हेरॉल्डचा मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून लखनौला पाठवले. पगार सहाशे रुपये. त्यामुळे इंदिराजींनीही आपले बिऱ्हाड लखनौला हलवले.

**'वडिलांना मदत करणे हे इंदिराजींना कर्तव्य वाटत होते. देशाच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे काम होते.' पाच वर्षे अशी ओढाताणीची गेली. इंदिराजी व फिरोज यांच्यातील दुरावा वाढत गेला.**

परंतु नेहरूंच्या घराची व्यवस्था बघण्यासाठी इंदिराजींना यावे लागले आणि लखनौला सतत राहणे त्यांना जमेना. तिकडे फिरोज नवनव्या स्त्रियांमध्ये गुंतत चालले होते. 'वडिलांना मदत करणे हे इंदिराजींना कर्तव्य वाटत होते. देशाच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे काम होते.' पाच वर्षे अशी ओढाताणीची गेली. इंदिराजी व फिरोज यांच्यातील दुरावा वाढत गेला. तशात, डिसेंबर १९४६ मध्ये संजयचा जन्म झाला. १५ ऑगस्ट १९४७ भारताला स्वातंत्र्य मिळाले. पं. नेहरू पंतप्रधान झाले. त्यामुळे त्यांच्याबरोबर राहून त्यांच्या घराचे व्यवस्थापन करणे हे एक कर्तव्यदक्ष कन्या म्हणून इंदिराजींना आपले उत्तरदायित्व वाटले. परिणामी स्वत:च्या पतीबरोबर अन्यत्र कुठे राहून स्वत:चे स्वतंत्र कुटुंब थाटून त्यात झोकून देणे हे त्यांना जमण्यासारखे नव्हते. त्याचे काही अटळ परिणामही होणे मग स्वाभाविक होते. पुढे पं. नेहरूंनी फिरोज गांधींना खासदारपद देऊन या दोघांनी पंतप्रधानांच्याच घरी राहावे अशी अपेक्षा बाळगली. काही दिवस तसे घडलेही. परंतु फिरोज



गांधींना ते फारसे मानवले नाही. ते स्वतंत्र राहू लागले. इंदिराजी व फिरोज यांच्यातील अंतर वाढत गेले. तीन मूर्ती भवन हे नेहरूंचे अधिकृत निवासस्थान - पण ते संग्रहालय आहे, घर नाही अशी टीकाटिपणीही त्यांच्यात होत राही. तशात काही छोट्यामोठ्या घटनाही वादळी ठरत. बुल्गानिन-क्रूश्चेव भेटीच्या वेळी व्यासपीठावर नेहरू व इंदिरा स्थानापन्न होते, परंतु फिरोज गांधींना सुरक्षाव्यवस्था अधिकाऱ्यांनी अडवले आणि प्रवेश नाकारला. फिरोज गांधींनी लोकसभेत तो प्रश्न उपस्थित केला. नेहरूंना माफी मागणे भाग पडले...

१९५३ मध्ये इंदिराजी इंग्लंडला राणी एलिझाबेथच्या (द्वितीय) राज्याभिषेकासाठी गेल्या. राजीव, संजय बरोबर होते. पण फिरोजने जाण्याचे नाकारले. जून १९५३ मध्ये पंतप्रधानांची कन्या म्हणून इंदिराजींचा रशिया दौरा प्रथमच झाला. नंतर चीनचा दौरा झाला.

फिरोज गांधींनी लोकसभेतील आपल्या पहिल्याच भाषणात रामकृष्ण दालमियांवर आणि त्यांच्या भारतीय इन्शुरन्स कंपनीवर हल्ला चढवला. चौकशी समिती नेमली गेली. इन्शुरन्सचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. फिरोज गांधींची भ्रष्टाचार विरोधी आणि पुरोगामी नेता म्हणून प्रतिमा जनमानसात स्थिरावू लागली... त्याचबरोबर तारकेश्वरी सिन्हा, खासदार महमुना सुलताना, सुभद्रा जोशी वगैरे ग्लॅमर गर्ल्स ऑफ इंडियन पार्लमेंट आणि फिरोज गांधी यांच्या सलगीबद्दल कुजबुज सुरू झाली. इंदिरा आणि नेहरूंचे सचिव मथाई यांच्यातील संबंधाची अफवाही खुद्द मथाईनीच पसरवून राजधानीत नव्या चर्चेला खमंग विषय पुरवला... या दोघांत प्रेमसंबंध होते का याविषयी कॅथरीन फ्रँकने काही तपशील दिले आहेत. (२७७-२८०).

**फिरोज गांधींची भ्रष्टाचार विरोधी आणि पुरोगामी नेता म्हणून प्रतिमा जनमानसात स्थिरावू लागली... त्याचबरोबर तारकेश्वरी सिन्हा, खासदार महमुना सुलताना, सुभद्रा जोशी वगैरे आणि फिरोज गांधी यांच्या सलगीबद्दल कुजबुज सुरू झाली.**

फिरोज-इंदिरा यांच्यातील ताणतणाव वाढत गेले. १९५८ मध्ये फिरोज गांधीना दोन हार्ट ॲटॅक लागोपाठ आले. तेंव्हा इंदिराजींनी त्यांची चांगली देखभाल केली. कुतुबमीनार परिसरात फिरोज गांधींनी एक जमीन विकत घेऊन घर बांधायचे ठरवले, त्यात दोघांनी एकत्र राहण्याचे ठरवले. जुन्या जखमांवर मलमपट्टी झाली. 'आपल्या वडिलांनंतर फिरोजच्या राजकीय कारकीर्दीसाठी काम करायचे' असा निर्णय त्यांनी घेतला. (२९६). परंतु सप्टेंबरमध्ये फिरोजना पुन्हा हार्ट ॲटॅक आला आणि त्यातच त्यांना मृत्यु आला. (२९६). पारशी पद्धतीने टॉवर ऑफ सायलेन्समध्ये गिधाडांना भक्ष्य

म्हणून आपला देह अर्पण करण्याची कल्पना फिरोज गांधींना नापसंत होती; त्यामुळे त्यांच्यावर हिंदू पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. (२९७). पतीच्या निधनाने इंदिराजींना धक्का बसला. त्या आजारी पडल्या 'कोणीतरी माझे दोन तुकडे करून टाकले' असे त्यांना वाटले. 'फिरोज गेला आणि माझ्या जीवनातील सगळे रंगच विटून गेले.' असे म्हणून पांढरी वस्त्रे त्या परिधान करू लागल्या. (२९९).

इंदिराजींच्या जीवनातील असे अनेक तपशील कॅथरीन फ्रँक यांनी अत्यंत वस्तुनिष्ठपणे कागदपत्रांच्या आधारे या चरित्रग्रंथात मांडले आहेत. आपल्याकडील चरित्रकार ज्या गोष्टींवर लिहिण्याचे टाळतात (उदा. नेहरू आणि पद्मजा नायडू यांचे संबंध; फिरोज गांधी यांचा बाहेरख्यालीपणा, इंदिरा गांधी आणि मथाई यांच्यातील तथाकथित संबंध, विजयालक्ष्मी आणि कमला नेहरू यांच्यातील बेबनाव) त्यावरही कॅथरीन फ्रँक दोन्ही बाजू देण्याचा प्रयत्न करतात.

नेहरूंच्या नंतर शास्त्रीजी पंतप्रधान झाले. ताश्कंदमध्ये त्यांचा मृत्यू झाल्यावर, इंदिराजी पंतप्रधान झाल्या... बांगलादेशाचा स्वातंत्र्यलढा, आणीबाणीचे पर्व, इंदिराजींचा पडता काळ, पुन्हा उभारी, ऑपरेशन ब्लू स्टार...हा सगळा पुढचा घटनाक्रमही कमीजास्त तपशीलांद्वारे या चरित्रात आला आहे. इंदिराजींच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वावर त्याद्वारे प्रकाश पडतो. इंदिराजींनी पत्राद्वारे आपल्या त्या त्या वेळच्या भावना प्रकट केल्या आहेत. त्यातील उतारे जागोजाग चरित्रात देण्यात आले आहेत. त्यामुळे इंदिराजींच्या मनात त्यावेळी काय काय चालले होते याचा अंदाज येतो. इंदिराजींच्या शेवटच्या दिवसाचे वर्णनही चटका लावणारे आहे.

जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राचे नेतृत्व दीड तप करणाऱ्या या मनस्वी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू प्रकट करणारे हे चरित्र अनेक नाट्यपूर्ण घटनांनी चटकदार आणि वाचनीय बनलेले आहे. अनेक कादंबऱ्यांचा विषय व्हावे अशा घटनांची त्यात रेलचेल आहे. एक बुजरी मुलगी, एक कर्तव्यदक्ष कन्या, एक प्रेयसी, एक पत्नी, पती आणि पिता यांच्या नात्यातील ताण सहन करणारी स्त्री, राजकारणी मुत्सद्दी महिला, आणीबाणीत बेछूट सत्ताकांक्षा दाखवणारी निष्ठूर सत्ताधीश स्त्री - अशी विविध रूपे बघताना कोणीही चक्रावून जावे असे हे व्यामिश्र व्यक्तिमत्त्व अशा अनेक चरित्रकारांनाही पुरते पकडता येईल असे वाटत नाही. कॅथरीन फ्रँकच्या या चरित्रामुळे त्या दिशेने प्रयत्न करणाऱ्यांचा मार्ग थोडातरी सुकर होईल. पुपुल जयकर वगैरे मैत्रिणींच्या स्नेहार्द्र दृष्टीतून जाणवणाऱ्या इंदिराजी काहीशा सहजगम्य ठरतात. कॅथरीन फ्रँकच्या पुस्तकातून त्यांची विविध परिमाणे लक्षात येतात आणि त्यांच्याबद्दलचे कुतूहल अधिक गूढ गडद होत जाते.

**पृष्ठे : ५९६ ● किंमत : ४००रु. ● सभासदांना : २८०रु. ● पोस्टेज : ३०रु.**



# पुरस्कार

## * डॉ. आनंद यादव यांना लाभसेटवार पुरस्कार

मराठीत ग्रामीण साहित्याची चळवळ रुजविणारे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांना यंदाचा लाभसेटवार फाउंडेशन पुरस्कार देण्यात आला. एक लाख रुपये रोख व स्मृतिचिन्ह असा हा पुरस्कार आहे.

नागपूरयेथील 'लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट' व अमेरिकेतील लाभसेटवार फाउंडेशनतर्फे मराठी साहित्यक्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल मुंबईत आठ जानेवारीला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. श्री. ना. पेंडसे, विंदा करंदीकर, गंगाधर गाडगीळ व भालचंद्र नेमाडे यांना यापूर्वी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

लाभसेटवार फाउंडेशनचा पुरस्कार म्हणजे आतापर्यंतच्या सन्मानातील शिरपेच आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. यादव यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ''नव्या दमाच्या




*डावीकडून श्री.विजय ढवळे, डॉ. आनंद यादव, मा.बाबासाहेब पुरंदरे, श्री. व. सौ. लाभसेटवार*

ग्रामीण लेखकांकडून कसदार, घसघशीत साहित्यनिर्मिती होत असताना हा पुरस्कार मिळणे ही आनंदाची गोष्ट आहे. कष्टकरी शेतकऱ्यांच्या घरात जन्मलेल्या मला साहित्यातील, कवितांतील उपऱ्या कल्पना खटकायच्या. रोमँटिसिझममधून जन्मलेल्या या साहित्यात ग्रामीण जनजीवनातील रोजचा संघर्ष कोठेच नव्हता. पुणे, ठाणे, मुंबई या परिघाच्या बाहेर तयार होणाऱ्या साहित्याला आता मानाची जागा मिळाली आहे. आज ग्रामीण भागातच कसदार साहित्य निर्माण होते. साहित्य अकादमीचे गेल्या काही वर्षांचे पुरस्कार त्याचे निदर्शक आहेत. बदलणाऱ्या ग्रामीण जीवनाची प्रेरणा नवोदित लेखकांच्या निर्मितीत दिसते.'' आपल्या जडणघडणीबद्दल बोलताना ते म्हणाले, ''लहापनपणापासून मला साहित्याची आवड होती. त्यामुळे मी सतत वाचत राहिलो. मला साहित्याच्या क्षेत्रात आणणारे, पु. ल. देशपांडे, यांच्यामुळे मी आजवरची मजल मारू शकलो. 'मोठा साहित्यिक होशील' या त्यांच्या आशीर्वादामुळे व प्रोत्साहनामुळे माझ्या जीवनात आशावाद निर्माण झाला. त्याचप्रमाणे श्री. पु. भागवत यांनी माझ्यावर साहित्याचे खोलवर संस्कार केले. निर्मितीप्रक्रियेसंबंधी, अनुभवांची मांडणी कशी करावी. भाषेचा पोत कसा असावा याबद्दल वेळोवेळी त्यांनी चर्चा केल्या. माझे साहित्यिक व्यक्तिमत्त्व घडण्यास त्यांचा मोठा सहभाग आहे तसेच कोणत्याही लेखकाला चांगला प्रकाशक मिळणे हेही भाग्याचे लक्षण असते. माझे प्रकाशक श्री. अनिल मेहता यांच्याशी माझे दुहेरी तिहेरी नाते आहे. अत्यंत जवळचा स्नेही, रसिक वाचक आणि प्रकाशक असे अत्यंत गहिरे नाते आमच्यात विणले गेले. ज्या धडाडीने मेहतांनी माझी पुस्तके प्रकाशित केली, त्यासाठी विविध उपक्रम राबविले व अथक परिश्रम केले त्याला तोड नाही. त्यामुळेच माझी पुस्तके रसिकांपर्यंत पोहोचली व मला लोकमान्यता मिळाली. आज मला मिळालेला हा पुरस्कार या सर्वांचा तसेच माझ्या सर्व रसिक चाहत्यांचा आहे. असे मला वाटते.''

यावेळी डॉ. अनंत लाभसेटवार व श्री. बाबासाहेब पुरंदरे,डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी डॉ. आनंद यादव यांच्याबद्दल गौरवपूर्ण भाषणे झाली. आपल्या भाषणात श्री. सुनीलकुमार लवटे म्हणाले, ''डॉ. लाभसेटवार हे दानशील आहेत. तसेच महाराष्ट्राबद्दल, मराठी साहित्याबद्दल तळमळ असणारे सुहृद आहेत.'' यादवांचा गौरव करताना ते म्हणाले ''सर्व भाषांमधे महत्वाचे जे काही ग्रामीण लेखक आहेत त्या सर्वांमध्ये यादवांचे स्थान हे अत्यंत उच्च आहे. आता मराठी भाषेसाठी जर ज्ञानपीठ द्यावयाचे असेल तर त्याचे मानकरी म्हणून फक्त डॉ. आनंद यादव यांचेच नाव समोर येते.''

या कार्यक्रमास मुंबईच्या साहित्यप्रेमी रसिकांनी प्रचंड गर्दी केली.

### * कवी सुधांशू यांना 'सांगली भूषण' पुरस्कार

ज्येष्ठ कवी हणमंत नरहर जोशी तथा 'कवी सुधांशू' (औदुंबर) यांना यंदाचा 'सांगली भूषण' पुरस्कार श्रीक्षेत्र औदुंबर येथे भूतपूर्व सांगली संस्थानचे राजे विजयसिंह पटवर्धन यांच्या हस्ते ३० डिसेंबर रोजी देण्यात आला.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. ज्येष्ठ कवी सुधांशू १९३७ पासून काव्यलेखन करत आहेत. किर्लोस्कर, स्त्री, मनोहर मासिकांतून त्यांना प्रसिद्धी मिळाली. गीतासंग्रह, बालवाङ्मय, चरित्र ग्रंथ, स्थान महात्म्य, भावगीते आदींची पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.

श्रीक्षेत्र औदुंबरच्या दत्तावरील त्यांची अनेक गीते चांगलीच लोकप्रिय ठरली. सदानंद साहित्य मंडळाच्या माध्यमातून गेली ६१ वर्षे ते 'मकर संक्रांती'च्या दिवशी औदुंबर येथे साहित्य संमेलन भरवत आहेत. ग्रामीण भागात साहित्याचा प्रसार करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. यापूर्वी त्यांना पद्मश्री किताबही मिळाला आहे.

कवी सुधांशू यांनी लिहिलेली 'दत्त दिगंबर दैवत माझे', 'दिगंबरा दिगंबरा,' 'रुद्राक्षांच्या नकोत माळा, देव माझा विठू सावळा' अशी अनेक गीते गाजली आहेत.

### * 'कदम गुरुजी वाङ्मय पुरस्कार'

शिवगिरिजा प्रतिष्ठानचा 'सदाशिव नारायण कदम गुरुजी वाङ्मय पुरस्कार', मराठीतील नामवंत समीक्षक डॉ. गो. मा. पवार यांच्या 'महर्षि विठ्ठल रामजी शिंदे जीवनकार्य' आणि प्रसिद्ध साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या 'वाट तुडवताना' या कादंबरीस मिळाल्याचे प्रतिष्ठानचे सचिव प्रा. राजेंद्र यांनी सांगितले. यंदा पुरस्काराचे दहावे वर्ष आहे.

ग्रामीण भागात साहित्याविषयक अभिरुचीत वाढ व्हावी, यासाठी १९९५ साली कुर्डुवाडीत शिवगिरीजा प्रतिष्ठानची स्थापना झाली. पुस्तकापासून दूर चाललेल्या ग्रामीण भागातील लोकांना लेखक पहाता, ऐकता यावा, त्यांच्या लेखनप्रवासाची दिशा समजावी, यासाठी दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. रोख रुपये ५ हजार, स्मृतिचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### * अपंगांना बळ देणारी सेवा गरजेची

''शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्यांना दानदयेपेक्षा व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून केलेल्या सेवेची जास्त गरज आहे. अशी सेवा या अपंगांना स्वबळावर उभे राहण्यास मदत करील,'' असे प्रतिपादन डॉ. कल्याणी मांडके यांनी केले.

पुणे येथील 'रंगत-संगत प्रतिष्ठान'तर्फे 'मांडके हिअरिंग सर्व्हिसेस'च्या डॉ. मांडके यांना डॉ. सुरेश घैसास यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. पाच हजार रुपये व मानचिन्ह असे 'जिंदादिल पुरस्कारा'चे स्वरूप आहे.

अपंगांपुढील अडचणी कमी करण्यासाठी डॉ. मांडके प्रयत्न करीत आहेत.विद्या बाळ म्हणाल्या, ''तंत्रज्ञानाच्या प्रवासात तंत्र पुढे जाते आणि माणुसकी मागे

राहते. डॉ. कल्याणी मांडके यांनी ते होऊ दिले नाही. अपंग सदस्याकडे पाहण्याचा कुटुंबाचा दृष्टिकोन बदलला तरच समाजाचाही बदलेल.'' ध्वनिप्रदूषणाच्या विरोधात जागृती आवश्यक आहे असे सांगून डॉ. घैसास म्हणाले, ''१९७० मध्ये साठाव्या वर्षी येणारा बहिरेपणा १९८५ मध्ये पन्नासाव्या वर्षीच येऊ लागला. आता चाळिशीतच माणसे बहिरी होऊ लागली आहेत.''

### * थत्ते, कुलकर्णी यांना पुरस्कार प्रदान

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे देण्यात येणारा ना. ह. आपटे पुरस्कार डॉ. मधुकर कुलकर्णी यांच्या 'नाना फडणीस आणि मराठी राज्य प्रशासन' या पुस्तकाला, तर कै. ना. के. बेहरे पुरस्कार मिलिंद थत्ते यांना 'हिंदू अल्पसंख्य होणार का?' या पुस्तकासाठी बिंदुमाधव जोशी यांच्या हस्ते देण्यात आला.

### * 'सहकार महर्षी' साहित्य पुरस्कार

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील प्रतिष्ठान तर्फे देण्यात येणारा सहकार महर्षी साहित्य पुरस्कार यंदा ज्येष्ठा साहित्यिक विजय तेंडूलकर, प्रा. राजगुरु आगरकर व कवी श्रीधर तिळवे यांच्या साहित्य कृतींना तर 'जीवन गौरव' पुरस्कार मारुती चितमपल्ली यांना जाहीर झाला आहे.

विजय तेंडूलकर यांच्या 'कादंबरी दोन' या कादंबरीस, आगरकर यांच्या 'मरणकळा' या कथा संग्रहास तर श्रीधर तिळवे यांच्या 'क. व्ही' या काव्या संग्रहास हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामचंद्र मस्के यांनी सांगितले. तसेच वन, प्राणी आदींवर विपुर लिखाण करून साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल मारुती चितमपल्ली यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात येत असल्याचे ते म्हणाले. दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दिवंगत शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीदिनी १४ जानेवारीला हुतात्मा स्मृतीमंदिरात विधानसभेचे माजी सभापती व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अरुण गुजराथी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इरेश स्वामी अध्यक्षस्थानी होते. डॉ. शे. दे. पसारकर, डॉ. सुहास पुजारी, शरद एकबोटे यांच्या समितीने साहित्यकृतींची निवड केली.

### * प्रभावळकरांना पुणे मराठी ग्रंथालयाचा बनहट्टी पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे उत्कृष्ट कथा संग्रहासाठी देण्यात येणारा राजेंद्र बनहट्टी कथा पुरस्कार यंदा दिलीप प्रभावळकर यांच्या 'हसगत' कथासंग्रहाला जाहीर करण्यात आला आहे. १९ जानेवारी रोजी या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.






### * डॉ. शिवाजीराव चव्हाण

सातारा जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीचे प्रणेते व किसनवीर महाविद्यालयातील मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. शिवाजीराव चव्हाण (वय ६८) यांचे ९ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. प्रत्येक गावात ग्रंथालय उभे राहावे यासाठी ते प्रयत्नशील होते. नुकताच शासनाने त्यांना ग्रंथ मित्र पुरस्कार देऊन गौरविले होते. त्यांनी काव्य, कला व संस्कृती या विषयावर लिखाण केले.

'मराठी अध्यात्मशाहिरी' : उदय आणि विकास या विषयावर प्रबंध लिहून त्यांनी डॉक्टरेट मिळवली. शाहीर हैबती, मराठी लोकनाट्य, मराठी भेदिक कविता, पीरवाडीचे संभाजीनाथ महाराज वगैरे त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. सातारा येथे ग्रंथमहोत्सव भरवण्याच्या उपक्रमात त्यांचा पुढाकार होता. जिल्हा ग्रंथालय संघाचे ते अध्यक्ष होते. सातारला सुमित्राराजे ग्रंथालय त्यांनी सुरू केले. जिल्ह्यातही अनेक ग्रंथालये त्यांच्या प्रयत्नामुळे निघाली. त्यांच्या निधनाने ग्रंथालय चळवळीचा एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

### * ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक सोमनाथ समेळ

ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक सोमनाथ नानुभाई समेळ (वय ७५) यांचे ६ जानेवारी रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले.

ते काही काळ मुंबई मराठी पत्रकार संघाचे संयुक्त कार्यवाह होते. श्री समेळ यांचे युद्धशास्त्र, विज्ञान, अंतराळशास्त्र हे आवडीचे विषय होते. त्यांनी 'मौज' साप्ताहिकातून पत्रकारितेची सुरवात केली. त्यांनी 'गोमंतक', 'महाराष्ट्र टाइम्स', 'पुढारी' आदी दैनिकांतून काम केले. 'जादूची खिडकी', 'युद्ध व युद्धभूमी', 'युद्ध व डावपेच', 'पटावरील युद्ध', 'रायगड प्रदक्षिणा', 'अद्‌भुत विज्ञानकथा' आदी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

### * देवकीनंदन सारस्वत

कवी, लेखक, ज्योतिषी आणि ज्येष्ठ पत्रकार देवकीनंदन शंकरलाल सारस्वत यांचे ३ जानेवारी रोजी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन जावई, मुलगा असा परिवार आहे. सारस्वत हे 'जनसत्ता'चे काही काळ जिल्हा प्रतिनिधी, शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त, याशिवाय कवी, लेखक आणि ज्योतिषी म्हणून ते परिचित होते.

# वाचनालयांना आवाहन

**आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.**

**परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.**


**यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.**

**जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.**

**मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलीच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.**



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




### संमेलनाध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव (समीक्षा)

विनय हर्डीकर यांची प्रस्तावना व सामान्य वाचक तसेच साहित्यिक, संपादक, विचारवंत, समीक्षक अशा चाळीस एक उत्स्फुर्त लेखांचे संकलन असलेला गेल्या ७६ वर्षातील अशा प्रकारचा एका संमेलनाध्यक्षावरील पहिलाच प्रयत्न सर्व जाणकारांनी गौरविलेला ग्रंथ.

प्रतिमा प्रकाशन, पुणे.

संपा. : अरूण पारगावकर
किंमत : ३५० रुपये


### महाराष्ट्राचे राजकारण (राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ)


महाराष्ट्राच्या राजकारणाचे विभागीय आणि जिल्हा पातळीवरचे २००१-०२ च्या निवडणुकांचे मार्मिक विश्लेषण असलेला पहिलाच मराठी ग्रंथ.

लेखक : सुहास पळशीकर-नितीन बिरमल

किंमत : १८० रुपये

प्रतिमा प्रकाशन, पुणे.




### समकालीन भारतीय राजकारण (काँग्रेस वर्चस्व ते हिन्दु जमातवाद) (राजकीय)


१९८९ नंतर भारताच्या राजकारणात झालेल्या स्थित्यंतरांचा आजच्या राजकारणाच्या संदर्भातील चिकित्सक उहापोह करणारा एकमेव मराठी ग्रंथ. लोकशाही व्यवहाराचे मूल्यमापन, पक्षीय राजकारण, राजकीय अर्थव्यवस्था यांची उद्‌बोधक चर्चा.

प्रतिमा प्रकाशन, पुणे.

लेखक : सुहास पळशीकर
किंमत : २५० रुपये

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके





## रागदारी संगीतातील सौंदर्यस्थळे (रागदारी संगीत)

२६ प्रकरणांद्वारे रागदारी संगीताचे शास्त्र, त्याचा उगम व विकास, त्यातील विविध मतप्रवाह, विविध गायनशैली, शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीतातील साम्यभेद, त्यांचे मैफलीतील सादरीकरण इत्यादींचा वेध घेणारा ग्रंथ.

**लेखिका : रोचना भडकमकर**

**प्रतिमा प्रकाशन, पुणे.** **किंमत : १३० रुपये**

## आग (दलित कांदबरी)




मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीच्या पार्श्वभूमीवरील दलित तरुणांच्या मानसिकतेचे व प्रवृत्तींचे वास्तव चित्रण असलेली बहुचर्चित कादंबरी.

**लेखक : डॉ. बाबुराव गायकवाड**

**किंमत : १०० रुपये** **प्रतिमा प्रकाशन, पुणे.**




## तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय (समीक्षा)

आज तौलनिक साहित्य अभ्यासक्रमाला सध्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या तौलनिक साहित्य अभ्यासक्रमाच्या अकरा प्रकरणांतून घडविलेला सर्वांगीण परिचय.


**लेखक : प्रा.डॉ. र. बा. मंचरकर**

**प्रतिमा प्रकाशन, पुणे.** **किंमत : २२० रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके





## विसाव्या शतकातील मराठी समीक्षा

विसाव्या शतकातील १०० वर्षातील मराठी समीक्षेचे जाणकार अभ्यासकांचे चिकित्सक समालोचन असणारा एकमेव ग्रंथ. काव्य, नाट्य, कथा, कादंबरी समीक्षा तसेच सैद्धांतिक आणि उपयोजित समीक्षेचा येथे परामर्श घेण्यात आला आहे. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी या ग्रंथातील चर्चेचा समारोप केला आहे.

**लेखक : डॉ. विलास खोले**

**प्रतिमा प्रकाशन, पुणे.** **किंमत : १५० रुपये**


## 'स्त्री-प्रश्नां'ची वाटचाल (स्त्रीवादी समीक्षा)




स्त्रीवादी विचार १९६० नंतर सुरू झाला. चार विभागात स्त्री-प्रश्नांची मांडणी करून साक्षर केलेला चिकित्सक अभ्यास. स्त्रीवादाची 'टर्मिनॉलॉजी' या ग्रंथाद्वारे प्रथमच उपलब्ध होत आहे.

**लेखक : डॉ. विद्युत भागवत**

**किंमत : २९० रुपये** **प्रतिमा प्रकाशन, पुणे.**




## कायदा आणि माणूस (ललितेतर ग्रंथ)

जीवनव्यवहाराच्या कायद्यातील एका महत्त्वपूर्ण अंगाचा आणि त्यातल्या माणसाचा न्या. चपळगावकर यांनी घेतलेला हा शोध मराठी वाचकांनी पुन:पुन्हा वाचावा असा आहे.

**लेखक : न्या. नरेंद्र चपळगांवकर**

**प्रतिमा प्रकाशन, पुणे.** **किंमत : १०० रुपये**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**

## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके



### मुग्ध कहाणी प्रेमाची


कबीरांच्या सुंदर आणि भावात्म दोह्यांचे
ओशोंनी केलेले अत्यंत रसाळ विवेचन.

**मूळ लेखक : ओशो रजनीश**
**अनुवाद : मीना टाकळकर**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत १२० रु.**

### काबुलीवाल्याची बंगाली बायको




अफगाणीस्तानातून स्वत:ची सुटका करून
घेणाऱ्या जिगरबाज स्त्रीची विलक्षण सत्यकथा

**मूळ लेखिका : सुस्मिता बॅनर्जी**
**अनुवाद : मृणालिनी गडकरी**

**किंमत १०० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**



### शिवा डान्सिंग

परदेशी वास्तव्य करणाऱ्या भारतीयांच्या
मनातील संस्कृतीसंघर्ष चितारणारी
मनोवेधक प्रीतीकथा

**मूळ लेखिका : भारती कर्चनर**
**अनुवाद : मंजुषा गोसावी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत २५० रु.**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके



### या सुखांनो


सर्वांगांनी जीवनाचे मर्म शोधून सुखाचा
मार्ग दाखविणारे सुंदर ललित लेखन

**लेखक : सुरेश वसंत नाईक**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत १७० रु.**

### तो आणि ती




पती पत्नी दोघांनी एकमेकांना
'समजून' कसे घ्यावे याचे सुयोग्य मार्गदर्शन

**मूळ लेखक : जॉन ग्रे**
**अनुवाद : डॉ. रमा मराठे**

**किंमत २५० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**



### काबुलीवाला आणि इतर गोष्टी

रवीन्द्रनाथांच्या अजरामर साहित्यातील
अवीट गोडीच्या कथा

**मूळ लेखक : रवीन्द्रनाथ टागोर**
**अनुवाद : मृणालिनी गडकरी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत १०० रु.**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**

## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके



### मुग्ध कहाणी प्रेमाची


कबीरांच्या सुंदर आणि भावात्म दोह्यांचे
ओशोंनी केलेले अत्यंत रसाळ विवेचन.

**मूळ लेखक : ओशो रजनीश**
**अनुवाद : मीना टाकळकर**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत १२० रु.**

### काबुलीवाल्याची बंगाली बायको




अफगाणीस्तानातून स्वत:ची सुटका करून
घेणाऱ्या जिगरबाज स्त्रीची विलक्षण सत्यकथा

**मूळ लेखिका : सुस्मिता बॅनर्जी**
**अनुवाद : मृणालिनी गडकरी**

**किंमत १०० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**



### शिवा डान्सिंग

परदेशी वास्तव्य करणाऱ्या भारतीयांच्या
मनातील संस्कृतीसंघर्ष चितारणारी
मनोवेधक प्रीतीकथा

**मूळ लेखिका : भारती कर्चनर**
**अनुवाद : मंजुषा गोसावी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत २५० रु.**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके



### या सुखांनो


सर्वांगांनी जीवनाचे मर्म शोधून सुखाचा
मार्ग दाखविणारे सुंदर ललित लेखन

**लेखक : सुरेश वसंत नाईक**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत १७० रु.**

### तो आणि ती




पती पत्नी दोघांनी एकमेकांना
'समजून' कसे घ्यावे याचे सुयोग्य मार्गदर्शन

**मूळ लेखक : जॉन ग्रे**
**अनुवाद : डॉ. रमा मराठे**

**किंमत २५० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**



### काबुलीवाला आणि इतर गोष्टी

रवीन्द्रनाथांच्या अजरामर साहित्यातील
अवीट गोडीच्या कथा

**मूळ लेखक : रवीन्द्रनाथ टागोर**
**अनुवाद : मृणालिनी गडकरी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**किंमत १०० रु.**

**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा.**